# शब्दसुधा

## 2022 - 2023

■ आमचे प्रेरणास्थान ■

**मा. बी. पी. पवार**

संस्थापक सचिव, सु. ना. कला, विज्ञान व उ. खे. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

■ मार्गदर्शक ■

**प्राचार्य डॉ. जयंत बोबडे**

■ संपादक ■

**डॉ. भास्कर पाटील, प्रा. नेमीचंद चव्हाण**

■ सह संपादक ■

**प्रा. डॉ. गजेंद्र वासनिक, प्रा. डॉ. नितीन देऊळकार**

■ संपादक मंडळ ■

कु. मयुरी भस्कट, कु. पूनम गोपनारायण, गजानन ताथोड, कु.साक्षी ठाकरे, कु.प्रेरणा डहाणे, जयेश आसोलकर, आकाश उमाळे, अनिकेत उपरास, कु. दिव्या इंगळे,

: प्रकाशक :

**प्राचार्य डॉ. जयंत बोबडे**

मुखपृष्ठ : विजय गजभिये (माजी विद्यार्थी)

मुद्रक : योगिनी प्रिंट्स, मलकापूर, अकोला

( या अंकामध्ये प्रसिध्द झालेले लेखन हे त्या-त्या लेखकाचे, कवीचे असून संपादक मंडळ या लेखनास सहमत असेलच असे नाही. )

## ... शुभेच्छा संदेश ...

शामकी माता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, उमरी (बु.) जि. वाशिम व्दारा संचालित असलेल्या अकोला स्थित सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' शीर्षकाचा वार्षिकांक ( २०२२ – २३ ) प्रकाशित होत असल्यामुळे; मला शुभेच्छा देतांना फार आनंद होत आहे. प्राचार्य आणि संपादक मंडळाने महाविद्यालयीन तरुणांना आपले हक्काचे विचारपीठ शब्दसुधा' च्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन...... विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना लिहिते करण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती या संपादकीय मंडळाने स्वीकारली. त्या माध्यमातून त्यांचे विचार, भाव-भावना व्यक्त करण्याची ही मोठी उपलब्धी या माध्यमाने यशस्वी होत आहे. या अंकामध्ये समाविष्ट झालेले लेखन चांगल्या प्रकारचे आहेच. तरीही मला असे वाटते की, पुढील अंकामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये घडलेले सुखद किंवा दुःखद अनुभव शब्दबध्द करावेत. सोबतच बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, लोकगीते, महापुरुषांचे प्रेरणादायी विचार यांचे संकलन - आकलन करुन, विद्यार्थ्यांनी आपली लेखन कौशल्यता वाढवावी. याच हेतूने आम्ही महाविद्यालयात स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करुन दिली आहे, त्याचा जरुर लाभ घ्यावा.

मला आनंद आहे की या अंकामध्ये समकालीन प्रश्न मांडणारे लेखन यांचा समावेश झाला आहे. विद्यार्थ्यांनी सतत लिहित, वाचत राहिले पाहिजे. शेवटी जीवन काय आहे, याचा सार व्यक्त करणारा एक संदेश समाजमाध्यमावर फिरला, तो मला खूप भावला, तो आपण सर्वांना संदेश पुरक ठरेल, यासाठी आपल्यापुढे साभार व्यक्त करतो. जीवनातील सात सत्य - आरसा- खोटे बोलू देत नाही, सत्य- घाबरवू देत नाही, ज्ञान- मोहपाशामध्ये अडकवत नाही, विश्वास- कमकुवत होऊ देत नाही, प्रेम- व्देष करु देणार नाही, समाधान- दुःखी होऊ देणार नाही आणि कर्म- जीवनात अपयशी होऊ देणार नाही (साभार-गुगल प्ले स्टोअर) या सात सत्याचा स्वीकार करुन आपण आपले जीवन सफल करावे, जे इतरांनाही लाभदायक ठरणारे असेल. या सदिच्छांसह थांबतो.

श्री. बी. पी. पवार (संस्थापक सचिव)

शामकी माता शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ, उमरी (बु.) जि. वाशिम

## दोन शब्द : प्राचार्यांचे

## अभिनंदन .... आणि शुभेच्छाही

२०२२ - २३ या वर्षीचा आमच्या महाविद्यालयाचा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक प्रकाशित होत असतांना मला अत्यंत आनंद होत आहे विद्यार्थ्यांना आपल्या मनातील विचार, त्यांचे सुप्त गुण यांचा विकास करण्यासाठी वार्षिकांक महत्त्वाचा दस्तऐवज असतो. यामुळे विद्यार्थ्यांना लिखाणाची आवड निर्माण होण्यास मदत हाते. महाविद्यालयाने 'शब्दसुधा' हा वार्षिकांक दरवर्षी प्रकाशित करुन, विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असतो. विद्यार्थ्यांची प्रगती म्हणजे महाविद्यालयाची प्रगती असते, म्हणून त्यांचा व्यक्तिगत विकास व्हावा या करिता महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग व विविध अभ्यास मंडळांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात.

महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रस्थान मानुन विविध कार्यक्रम राबविले. यात विविध कार्यक्रमाचा समावेश आहे, ज्याची नोंद या अंकातील वार्षिक अहवालातून दिसून येते. यात समाविष्ट लेख हे विद्यार्थ्यांची लेखन व आकलन क्षमता सिद्ध करणारे आहेत. त्यातून इतरही विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच त्यांचे विचार शब्दबध्द करण्याचे कार्य हा 'शब्दसुधा' अंक निश्चितच करीत आहे. विद्यार्थ्यांच्या लेखनास या अंकातून प्रसिद्ध करुन, त्यांना हक्काचे विचारपीठ आमच्या 'शब्दसुधा' वार्षिकांच्या संपादक मंडळाने उपलब्ध करुन दिलेले आहे. संपादक मंडळाने अतिशय मेहनतीने, आकर्षक आणि वाचनीय अंक संपादित करुन दिला, त्याबद्दल या अंकाचे संपादक डॉ. भास्कर पाटील, प्रा. नेमीचंद चव्हाण तसेच वार्षिकांक समिती सदस्य डॉ.गजेंद्र वासनिक, डॉ. नितीन देउळकार या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो. या अंकाच्या पुढील वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

प्राचार्य डॉ. जयंत बोबडे

सु. ना. कला, विज्ञान व उ. खे. वाणिज्य महाविद्यालय, अकोला.

## संपादकीय...

प्रिय रसिक वाचक मित्रांनो, आपल्या महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा 'शब्दसुधा' हा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना विद्यार्थ्यांनी आपल्या अंतःकरणात दडलेल्या सुप्त गुणांना शब्दसुधाच्या माध्यमातून आविष्कृत केले आहे. शब्दसुधाचे संपादक या नात्याने आम्हाला खेद वाटतो की, दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचे वाचन आणि लेखन कौशल्याचे विस्मरण होत आहे, तरी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या वर्षीच्या अंकामध्ये जे साहित्य लेखन केले आहे ते उत्कृष्ठच आहे.

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक गुणवत्ता साधत असतांना उत्तम गुणांची पदवी प्राप्त करणे हे प्रत्येक विद्यार्थ्यांचे ध्येय असायला हवे. त्यासोबतच कला, क्रीडा, साहित्य लेखन, ह्या क्षेत्रातील ज्ञान, आनंद मिळविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे  सर्व आवश्यक आहे. पदवी घेऊन बाहेर पडल्यानंतर, सामाजिक जीवनात वावरतांना, महाविद्यालयातील हा सर्वकश अनुभवच तुम्हाला एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणार आहे.

'शब्दसुधा' हा वार्षिकांक सुंदर आणि आकर्षक करण्यासाठी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव, श्री. बी. पी. पवार  सर, मा. प्राचार्य डॉ. जयंत बोबडे सर,  यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संपादक मंडळातील सदस्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या उत्स्फूर्त व सक्रिय सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. या अंकात समाविष्ट सर्व कवी - लेखक व संकलक यांचे सहर्ष अभिनंदन. हा अंक प्रसिद्ध करण्यासाठी संपादक मंडळावर प्राचार्यांनी जो विश्वास दाखविला, स्वातंत्र्य दिले, त्यामुळेच अंक अधिक सुबक करण्यास संपादकांना आनंद वाटला. त्यासाठी महाविद्यालयाचे व  संस्थेचे संपादक मंडळाकडून आभार. या अंकास अधिक आकर्षक करण्यासाठी कु. मयुरी भस्कट  व राठोड  यांनी छायाचित्र सजावट करुन दिली. तसेच योगिनी प्रिंट्सचे श्री गजानन वाघमारे यांनी अंक सुबक व दर्जेदार करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आभार व या अंकातील त्रुटीबद्दल क्षमस्व !

- संपादक मंडळ

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत

" आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवते ते स्वप्न खरं " – डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

काही माणसे त्यांना एखादं पद मिळालं की मोठे होतात. पण काही ऐतिहासिक युगपुरुष त्यांनी भुषविलेल्या पदाची शान आणखी उंचावतात. त्याच भारताच्या महान सुपुत्रापैकी एक म्हणजे भारताचे ११ वे महान राष्ट्रपती, पद्मभूषण, पद्मविभूषण, शास्त्रज्ञ, शिक्षक, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ( जन्म १५ ऑक्टोबर १९३१) आपल्या आगळया कार्यपद्धतीमुळे ते जगात 'लोकांचे राष्ट्रपती' म्हणून लोकप्रिय झाले. पोखरण अणुचाचणी, पृथ्वी आणि अग्नी क्षेपणास्त्र असो, ह्यांच्या निर्मितीत डॉ. कलाम साहेबांचे अतिशय मोलाचे योगदान देश कधीही विसरू शकणार नाही. देशाच्या संरक्षण क्षेत्रात उंच गरुडभरारी घेणारे हे व्यक्तिमत्त्व अतिशय शांत, संवेदनशील आणि अतिशय साधे जीवन जगणारे होते. अगदी राष्ट्रपती भवनात आपले स्वतःचे दोन जोड कपडे घेऊन प्रवेश करणारे आणि तेथून परत येताना फक्त आपले दोन जोड कपडेच घेऊन परत येणारे असे हे निष्काम कर्मयोगी ह्या जगात फार कमीच म्हणावे लागेल. म्हणूनच संपूर्ण जगाला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची भूरळ पडली होती. ज्ञानाची अखंड साधना हे त्यांचे खास वैशिष्ट्य.

आयुष्यभर डॉ. कलामांचे एक वैशिष्ट्य होते आणि कुणीतरी त्यांना विचारले की, तुम्हाला कसे आठवणीत ठेवता येईल? त्यांनी उत्तर दिले होते की मला शिक्षकाच्या रुपात लक्षात ठेवावे. हा शिक्षकांचा सन्मान तर आहेच पण त्यांच्या आयुष्यातील श्रद्धा काय होती, बांधिलकी काय होती याचीही ओळख होती. भारतासारख्या देशाला पुढे जाण्यासाठी, प्रभाव निर्माण करण्यासाठी गतीने चालायचे आहे तर येणाऱ्या पिढ्यांना तयार करावे लागेल असे डॉ. कलाम नेहमी प्रतिपादन करायचे आणि त्यासाठीच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. भारत बलवान व्हावा पण केवळ अस्त्र शस्त्रांनी व्हावा ही त्यांची इच्छा नव्हती. शस्त्राचे सामर्थ्य आवश्यक आहे हेही ते नाकारत नव्हते. पण त्यांना असे वाटायचे की देश सामर्थ्यवान होतो, तो त्या देशातील जनतेच्या सामर्थ्यावर आणि दुर्दम्य आशावादावर. म्हणून कलाम साहेब या दोन्ही प्रवाहांना एकत्र घेऊन चालत होते, एकीकडे नाविन्यपूर्ण शोध व्हावे, संशोधन व्हावे, संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर व्हावा आणि हीच प्रगती सामान्य गरीब, भारतीय तसेच जगातील इतर दुबळया देशांना उपकारक ठरो, इतके त्यांचे विचार औदार्य दाखविणारे होते.

"इंडिया २०२ : ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम" ह्या त्यांच्या पुस्तकांच्या आधारेच तत्कालीन नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. भारतीय लोकांच्या दुर्दम्य आशावाद आणि साहसी वृत्तीवर डॉ. कलामांचा अतूट विश्वास होतो. त्यांनी बघितलेल्या स्वरूपाच्या पूर्ततेसाठी देशातील तरुण, विद्यार्थी आणि शिक्षक महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात असे ते नेहमी प्रतिपादन करायचे. त्यांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये आयुष्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींच्या यादीत त्यांच्या शिक्षकांचाही अग्रक्रमाने समावेश होतो. इयत्ता ५ व्या वर्गात असताना रामेश्वर येथील शिव सुब्रमन्यम नावाचे शिक्षक होते. त्यांच्या शिकविण्याचा परिणाम म्हणून आपण संशोधन क्षेत्राकडे वळलो असे तो आवर्जून सांगतात. त्यांच्या स्वप्नातील भारत आणि त्यासाठी त्यांनी रचलेला पाया हे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर आपल्याला आपली शिक्षण पद्धतीसुद्धा त्याच पद्धतीने राबवावी लागेल. त्यादृष्टीने आजच्या शिक्षण पद्धतीकडे तटस्थपणे बघितले असतं आपणास असे लक्षात येते की, भारतीय शिक्षण पद्धती हि संक्रमणातून

जात आहे. जी शिक्षण पद्धती हि अगोदर फक्त शिक्षक केंद्रित होती ती आता विद्यार्थी केंद्रित होत आहे. विद्यार्थीपूरक ज्ञानरचनावाद आपण आता स्वीकारला आहे आणि त्याकडे आपण यशस्वीपणे मार्गक्रमण करत आहोत.

**- कु. वैष्णवी अरुण राऊत**

**बी. कॉम भाग -१**

## स्त्रीजीवन - एक संघर्ष

आज आपण २९ व्या शतकात राहतो. आपण सर्वच क्षेत्रांत खूप प्रगती केली आहे. पण आजही आपण एक गोष्ट पाहतो कि ज्यामध्ये अजून आवश्यक तितकी प्रगती झालेली नाही. ते म्हणजे स्त्रियांचे घरातील समाजातील, खालचे / दुय्यम स्थान. आज महिला आपल्याला पुरुषाबरोबर काम करतांना दिसतात. बस चालवतात, विमान चालवतात, अंतराळात पण जातात, आज महिला शिक्षक, राष्ट्रपनी, पंतप्रधान, मंत्री इ. पदांवर कार्य करतांना दिसून येतात. पण आपण जर काळजीपूर्वक पाहिले तर खूप कमी महिलांना ही संधी मिळते. जास्तीत जास्त महिला या घराच्या कामातच गुंतलेल्या आहेत. आजही महिलांना घरात किंवा समाजात पुरुषाइतके स्थान नाही. त्यांना पुरुषांच्या मर्जीनेच काम करावे लागते.

आज आपण पाहिले तर परिस्थिती ठिक वाटत असेल. पण आजही गावात आपल्याला स्त्रियांवर होणारे घरगुती अत्याचार पाहायला मिळतात. आजही बालविवाह पध्दत आहे. आजही मुलींना मुलांइतका भाव नाही, आजही लिंग ओळखून स्त्री भ्रूणहत्या होत आहे. आजही स्त्रियांवर शारिरीक व मानसिक अत्याचार होत आहे. उलट यामध्ये वाढ झालेली. सरकारने स्त्रियांचे सुरक्षितेसाठी नवीन कायदे केले आहेत, पण त्यांचा सकारात्मक परिणाम आपल्याला पाहायला मिळत नाही.

मला प्रश्न पडतो की आपण स्त्रियांना अशी वागणूक का देतो ? ती जननी आहे, ती जन्म आहे, तिच जीवन आहे. स्त्री प्रत्येकवेळी एक आई, बहीण, पत्नी, मैत्रीण इ भुमिका व्यवस्थितरित्या पार पाडतात. पण पुरुषवर्ग स्वतःलाच वर्चस्वी दाखवतात. असे असले तरी स्त्रियांनी हिंमत मात्र सोडली नाही. त्या पडतात आणि पुन्हा उठतात त्यांच्यात खुप धैर्य, शौर्य आहेत. मला खात्री आहे की खरे पुढील काही वर्षांनी स्त्रिया आपल्याला पुरुषांच्या बरोबरीने दिसतील अजून महिलांना संघर्ष करावाच लागेल. त्यांना खरे स्वातंत्र्य मिळवावेच लागेल. त्यांचे खरे स्वातंत्र्य म्हणजे त्यांना स्वतः विषयी निर्णय घेण्याचे अधिकार मिळेल. त्यांच्याकडे दुय्यम नजरेने पाहिले जाणार नाही. समाजातील स्त्रीविरोधी घटक संपेल. बल नष्ट होऊन जाईल. थोडे कठीण आहे पण नक्कीच शक्य आहे.

**कु. रोशनी जानकीराम राठोड**

**बी. ए. भाग -२**

## स्त्री – शिक्षण आणि विकास

“स्त्रीच्या व्यक्तिमहत्त्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्वाचे साधन म्हणजे स्त्रीशिक्षण होय.”

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण हा भारतातील प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. परंतु भारतातील महिला शिक्षणाची स्थिती अजूनसुद्धा अवघड आहे. स्त्री-शिक्षण हा एक मूलभूत अधिकार आहे. परंतु भारतातील प्रत्येक राज्याच्या तुलनेत लिंग साक्षरतेच्या दरामध्ये बराच अंतर आहे. उदाहरणार्थ, केरळमध्ये महिला साक्षरतेचे

प्रमाण ९२% आहे, तर बिहारमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण ५०% आहे. जागतिक स्तरावरील पुरुष साक्षरतेच्या तुलनेत महिलांमध्ये एकूणच साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे.

महिलांच्या शिक्षणाने समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण भुमिका बजावली जाते. सुशिक्षित महिला मुली-मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतात आणि मुलांना अधिक चांगले मार्गदर्शन देखील करतात.

**भारतातील महिला शिक्षणाचा इतिहास -**

वैदिक कालखंडात, भारतातील स्त्रियांना शिक्षणापर्यंत प्रवेश होता, परंतु काही काळानंतर हळूहळू त्यांचा हक्क गमावला. ब्रिटीश काळात भारतातील स्त्रियांच्या शिक्षणामध्ये पुन्हा रुची निर्माण झाली. या काळात राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी अनेक प्रख्यात भारतीय व्यक्तींनी भारतातील महिलांच्या शिक्षणावर भर दिला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि पेरियार यांच्यासारख्या नेत्यांनी भारतीय महिलांना शिक्षण उपलब्ध करून दिले.

१९४७ च्या स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने महिलांच्या शिक्षणासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी पावले उचलली. याचा परिणाम म्हणून, दशकांमध्ये भारताातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण हळूहळू वाढले आहे.

**ग्रामीण भारतातील महिला शिक्षण -**

जरी शहरी भारतात महिला साक्षरतेचे प्रमाण ६४% आहे, तरीही ग्रामीण महिला साक्षरतेचे प्रमाण निम्मे आहे, म्हणजेच जवळजवळ ३१% महिलांच्या साक्षरतेच्या या कमी दरामुळे ते केवळ महिलांच्या जीवनाचाच नव्हे तर त्यांच्या कौटुंबिक आणि देशाच्या आर्थिक विकासालाही नुकसान करीत आहे. स्त्रियांचे कमी प्रजनन दर, निकृष्ट दर्जाचे जीवनमान, पौष्टिकतेचे निकष आणि घरातील मिळणारे स्वातंत्र यासारखे दुष्परिणाम विविध अभ्यासकांनी सिद्ध केले आहेत. उदाहरनार्थ, नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणात असे आढळले आहे कि, बालमृत्यूचा दर आईच्या शिक्षणाच्या पातळीशी संबंधित आहे.

**भारतातील महिला शिक्षणावर परिणाम करणारे घटक -**

महिलांच्या शिक्षणावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत.

१) **उच्च शिक्षण प्रणालीतील महिलांची कमी उपस्थिती**

जरी अमेरिका आणि चीननंतर भारत तिसऱ्या क्रमांकाच्या उच्च शिक्षण प्रणालीचा अभिमान बाळगतो, तरी उच्च शिक्षणाच्या बहुतांश संस्थांमध्ये महिलेची नोंद कमी आहे हे आश्चर्यकारक आहे.

२) **भौगोलिक फरक**

साक्षरता दर भारतातील सर्व राज्यांमध्ये एकसाखी नाही. उत्तरेकडील राज्यांच्या तुलनेत दक्षिणेकडील राज्ये भारतातील महिलांच्या शैक्षणिक योजनांसाठी अधिक सक्रीय आहेत.

३) **व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण**

विद्यार्थ्यांनी व्यावसायिक शिक्षणाची निवड केली आहे कारण विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात मदत करणारे कार्यक्रम उपलब्ध करून देणे हे आहे. भारत सरकारने फक्त महिलांसाठी तांत्रिक संस्था सुरु केल्या आहेत, ज्या त्यांना वस्त्रोद्योग, अन्न, फार्मसी तंत्रज्ञान, व्यावसायिक कला इ. प्रशिक्षण देतील. महिला या संस्थांमध्ये भाग घेत नाहीत.

४) **महिला शिक्षणाची गरज**

१२८ देशांपैकी भारत सर्व विकास निर्देशाकांत १०५ व्या क्रमांकावर आहे. भारताची शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत आणि स्त्रियांना शिक्षणापर्यंत प्रवेश देण्यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. मानसिक, सामाजिक आणि संरचनात्मक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे जेणेकरून बहुतेक स्त्रिया शिक्षण प्रणालीत भाग घेऊ शकतील.

जरी महिला आणि शिक्षणाच्या आवश्यकतेसाठी स्थानिक संस्था संवेदनशील करण्यासाठी विविध संस्था आणि सरकारी योजना गुंतलेल्या आहेत, तरीही ते मुलींना शिक्षणासाठी शाळेत पाठविण्यास विरोध करतील. पालकांना आपल्या मुलीला शिक्षणासाठी पाठवण्याचे महत्त्व समजल्याशिवाय, ते त्यांचा उपयोग घरातील कामे किंवा शेतीविषय कामांमध्ये मदत म्हणून करणे कमी करणार नाहीत.

भारत सरकारने महिला शिक्षणाच्या अधिक चांगल्यासाठी अनेक धोरण आणि सुधारणा सुरू केल्या आहेत. परंतु आता आपल्याला अशा साध्या उपायांचा विचार करावा लागेल, ज्यामुळे भारतातील महिला शिक्षणाची स्थिती सुधारण्यास मदत होईल. आपण प्रत्येक घरापासून सुरुवात केली तर महिला शिक्षण वाढविले जाऊ शकते. आपण मुलगी मुलाला ओझे समजू नये. स्वयंपाक, कपडे धुऊन मिळण्याचे ठिकाण आणि इतर घरातील नोकऱ्या फक्त महिलांसाठी आहेत, असा विचार करणे थांबवा. स्त्रियांना मैत्रिणींना / नातेवाईकांना प्रोत्साहित करा, की मुलीचे शिक्षण फक्त थांबवू नका. कारण तिला एक उत्तम सन्मान मिळाला पाहिजे.

आज आपल्या देशात मुलींचे व स्त्रियांचे शिक्षण काळाची गरज बनलेली आहे. समाजातील स्त्री शिक्षणाचे महत्त्व भरपूर आहे. आजही देशातील अनेक ठिकाणे अशी आहेत जिथे स्त्रियांना शिक्षित केले जात नाही, ज्यांना शिक्षणाचा अधिकार नाही. एका सभ्य आणि सुशिक्षित समाजाचे निर्माण त्या देशातील शिक्षित नागरिकांमुळे होते. असे मानले जाते की एका पुरुषाला शिक्षित केल्याने एकच व्यक्ती शिक्षित होतो आणि एका स्त्रीला शिक्षित केल्याने संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. स्त्री कुटुंबाचा केंद्रबिंदू असते. ती आईच्या रुपात आपल्या मुलांना संस्कार देते. देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी पुरुषांसोबत स्त्रियांनाही शिक्षित करणे  महत्त्वाचे आहे.

**कु. श्वेता शशिकुमार सिरसाट**

**बी. ए. भाग- २**

## लोकसंख्येच्या विस्फोटाचे परिणाम

**लोकसंखेच्या विस्फोटाची कारणे -**

जन्म मृत्यू दरामधील तफावत :-

स्वातंत्रोत्तर काळात अतिशय विषयक सोयीसुविधांमध्ये बरीच वाढ झाली. यामुळे मृत्युदर निम्यापेक्षाही कमी झाला. सरासरी आयुर्मान ३२.१ वरून जवळपास ६८ वर्षापर्यंत वाढले आहे. परंतु जन्मदर नियंत्रण करण्याचे प्रयत्न करूनही तो कमी करण्यात फारशे यश प्राप्त झाले नाही. ५० वर्षाच्या काळात जन्मदरामधील घट केवळ मर्यादित आहे.

कमी विवाह वय :-

काही वर्षापूर्वी बालविवाह पद्धती होती. समाजसुधारकांचे प्रयत्न, स्थानकाचे कायदे यामुळे स्वातंत्र काळात बालविवाहाचे प्रमाण बरेच कमी झालेले आहे. १९०१ मध्ये मुलींचे सरासरी विवाहाचे वय ४२.२ वर्ष होते. ते १९८५ मध्ये १७ वर्ष झाले आहे. पुरुषाचे सरासरी विवाहाचे वय २२, २३ वर्ष झाले आहे. बालवयातच विवाह

करून देणे हे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे, अशी राज्यस्थानामधील मुलामुलींच्या पालकांची समजूत आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने मुलांचे सरासरी विवाह वय २८ ते २४ असणे योग्य असे समजले जाते. भारतात नागरी, ग्रामीण समुदायात अशातरेने वाढ होते, राजकीय पक्षा या परिस्थितीचा फायदा घेण्याचा म्हणजे लोकांना सत्तारूढ पक्ष विरुद्ध भडकविण्याचा प्रयत्न करतात.

शहरीमानाचा दर्जा खालावतो :-

लोकसंख्यावृद्धीचा शहरीभागाच्या दर्जाशी सरळ संबंध आहे. याच कारणामुळे भारतात स्वातंत्रोत्तर काळात पंचवार्षिक योजनेमुळे कृषि व औद्योगिक क्षेत्रात आरंभ प्रगती होऊन देखील दर मानसी उत्पन्नात उल्लेखित स्वरुपाची वाढ झाली नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे विकासाच्या योजना अपुऱ्या पडतात व शहरीमानाचा दर्जा खालावत आहे.

सामाजिक सेवा अपुऱ्या पडतात :-

शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक सुरक्षा यासारख्या अनेक सामाजिक सेवा आधुनिक काळात राज्यसंस्थेद्वारे उपलब्ध करून दिल्या जातात. प्रचंड प्रमाणात लोकसंख्या वाढ होत राहिली तर राज्याद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सामाजिक सेवा अपुऱ्या पडतात. महाविद्यालयीन शिक्षणाची वाढत्या प्रमाणातील गरज पूर्ण व्हावी, या उद्देशाने वाढत्या नोकरसंख्यामुळे आरोग्य विषयक सेवांचा फायदा सर्व लोकांपर्यंत पोहचवतानाही वाहतूक व अन्य आवश्यक सेवाबाबातही हेच घडते.

लोकसंख्यावृद्धी आणि सामाजिक समस्या :-

लोकसंख्या जास्त वाढली की, अन्नधान्याचे उत्पादन कमी पडू लागते. उपोषण व उपासमारीची समस्या निर्माण होते. दारिद्र्य, भिक्षावृत्ती बेरोजगारी या समस्या निर्मितीसाठी लोकसंख्या वृद्धी हेच कारण आहे. यातून विवाह संबधाचे विच्छेदन, घटस्फोट, कुमारी मातांचे प्रश्न, वृद्धीचे प्रश्न, भटक्या, अनाथ मुलांचे प्रश्न यासारख्या अनेक समस्या निर्माण होतात.

प्रदूषण :-

लोकसंख्येचा प्रचंड आकार हे प्रदूषणाच्या समस्येचे कारण ठरते. प्रचंड आकाराच्या लोकसंख्येचे पालनपोषण करण्यासाठी अधिकाधिक कारखाने स्थापन केले जातात. दुचाकी आणि चारचाकी स्वयंचलित वाहने आणि कारखाने सर्वात जास्त वायुप्रदूषण असलेले शहर अशी दिल्लीची स्थिती आहे. प्रदूषण ही मानवजातीसाठी महत्त्वपूर्ण समस्या ठरत आहे. तसेच घरबांधणी, जळन यासारख्या कारणासाठी ही जंगल संपत्तीचा नाश केल्या जातो.

स्थलांतर :-

स्वातंत्रप्राप्तीच्या काळात पाकिस्तानातील हिंदूंनी भारतात मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले. युद्धकाळातही भारतात स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढले. अशाप्रकारे श्रीलंका, बांगलादेश, नेपाल, पाकिस्तान, तिबेट देशातून भारतात स्तलांतरित होणाऱ्या लोकांची वाढती संख्या हे भारतीय लोकसंख्यावृद्धीचे एक महत्त्वपूर्ण कारण आहे.

लोकसंख्या स्फोटाचे परिणाम

आर्थिक विकासात बाधक :-

वाढती लोकसंख्या हे विकासाच्या मागील मोठ्या अडथळा असते. भारतात विकासाचे दृश्य परिणाम सर्वसामान्य लोकांना जाणवत नाही, कारण वाढती लोकसंख्या ही विकासाची सर्व करणे फस्त करून टाकतो.

बेरोजगारीची समस्या :-

सध्याच्या काळात कृषि व औद्योगिक काळात विकास झाला आहे . अनेक रोजगाराच्या संधी नव्याने निर्माण झाल्या आहेत. तरीही बेरोजगारांची बढती संख्या हा लोकसंख्यावृद्धीचा परिणाम आहे.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या संख्येत वाढ :-

लोकसंख्या वाढली कि विविध कुटुंबात वारसदाराची संख्यादेखील वाढते. शेतजमीन संखेत वाढ होत नाही दारिद्र्यात वाढ होते कर्जबाजारी झालेली शेतकरी आत्महत्या सारखा अत्यंत चुकीचा मार्ग स्वीकारतात.

दरडोई उत्पन्नात घट :-

आर्थिक विकासामुळे राष्ट्राच्या सकल उत्पन्नामध्ये वाढ होते. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्नामध्ये घट होते यामुळे राहणीमानाच्या दर्जात घट होते आणि व्यक्ती दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकतात.

राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील दुष्परिणाम :-

लोकसंख्या वाढीमुळे सामाजिक सुरक्षेची समस्या अधिक बिकट होते.

विभिन्न नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा कमी होणे :-

खनिज तेल, कोळसा, लोखंड, तांबे या सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीचे साठे मर्यादित आहेत. लोकसंख्या वृद्धीमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा संपुष्टात येण्याची गती अधिक होते. लोकसंख्या नियंत्रित राहिल्यास नैसर्गिक साधन संपत्तीचा साठा अधिक दीर्घकाळासाठी पुरतो. ओद्योगीकरण आणि आधुनिकीकरणामुळे बहुतांश लोकांवर भौतिकवादी तत्त्वाचा पगडा निर्माण होतो. लोकसंख्या वृद्धीमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा झपाट्याने कमी होत आहे.

**कु. स्वाती सिरसाट**

**बी. ए. भाग -२**

## आदिवासी समाजातील जादू

सर्वप्रथम आदिवासींचा धर्म कोणता ? असा प्रश्न उपस्थित होतो. याबाबत खुद्द आदिवासी जमाती, त्यांच्या संस्था व संघटना, अभ्यासक, विचारवंत, नेते इत्यादी सर्वांच्या विचारांमध्ये आणि मतांमध्ये एकवाक्यता नाही. उदा :- काही जमाती आपला धर्म हिंदू धर्म आहे असे मानतात, तर काही आदिवासी जमाती आपला धर्म हिंदू धर्मापेक्षा वेगळा आहे असे मानतात.

आदिवासी समाजात धर्माच्या बरोबरीनेच जादुचेही अस्तित्व आहे. या समाजात जादू आणि धर्म परस्परांसमवेत असल्याचे दिसून येते. धर्माशिवाय केवळ जादू कोणत्याही आदिवासी जमातीत नाही. त्याचप्रमाणे जादुक्रीयांमध्ये काही प्रमाणात का होईना, धर्माचा समावेश असतो. म्हणूनच आदिवासी धर्माचा अभ्यास करताना त्यांच्या जीवनावर अभूतपूर्व परिणाम घडविणाऱ्या जादुचीही माहिती करून घेणे आवश्यक ठरते. जगातील सर्व आदिवासी जमातींप्रमाणेच भारतातील बहुसंख्य आदिवासी जमातींच्या धार्मिक जीवनाचे जादू हे विभिन्न अंग आहे हे लक्षात घेणे योग्य ठरते. स्टिफन फुक यांनी म्हटल्याप्रमाणे ‘ आदिवासी जीवनात धर्म व जादू यांचा समन्वय झाला असल्याचे दिसून येते.’

जादूचा अर्थ व व्याख्या -

धर्माइतकीच जादूही प्राचीन आहे. हिंदू पौराणिक ग्रंथात जादूच्या क्रियांचे वर्णन आहे. यामुळे धर्म अगोदर निर्माण झाला की जादू अगोदर निर्माण झाली याचे निश्चित असे उत्तर देणे अवघड आहे असे म्हणता येईल. केवळ भारतीय आदिवासींमध्येच नव्हे तर विभिन्न देशांमधील आदिवासी समाजात जादूचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. म्हणून आदिवासींच्या समाजशास्त्रात जादूच्या अभ्यासाला धर्माएवढेच महत्त्व दिले जाते असे म्हणता येते.

आदिवासींच्या मनात अलौकिक शक्ती किंवा अलौकिक प्राणी यांचे अस्तित्व आणि त्यांचे सामर्थ्य याबाबत अजिबात शंका नाही. या अलौकिक शक्तीला किंवा अलौकिक प्राण्याला आपलेसे करून घेण्याचे दोन मार्ग आहेत असे आदिवासींना वाटते. एक मार्ग म्हणजे प्रार्थना, यज्ञ व इतर कर्मकांड करून म्हणजेच धर्माच्या सहाय्याने या शक्तीला प्रसन्न करून घेणे होय. दुसरा मार्ग म्हणजे जादूच्या मार्गाने या शक्तीवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करणे होय. अशाप्रकारे अलौकिक शक्तीशी किंवा दिव्य प्राण्याशी मानवाच्या समर्पणात्मक किंवा अधिनतात्मक संबंधांना आपण धार्मिक संबंध म्हणजे धर्म असे संबोधतात.

याउलट अलौकिक शक्ती किंवा दिव्य प्राणी यांच्यावर वर्चस्व किंवा नियंत्रण प्रस्थापित करून त्या शक्तीकडून मनोवांछित क्रिया करून घेण्याच्या पद्धतीला जादू असे म्हणतात.

जेम्स फ्रेझर यांची जादूची व्याख्या अशी आहे का, " जादू हे असे आभासी विज्ञान आहे की, जे कारणसंबंधाच्या अटल नियमानुसार निसर्गावर दबाव आणते."

जादूची व्याख्या करताना मोलीजोवस्की म्हणतात, " हेतू सिद्धीसाठी साधन म्हणून वापरल्या जाणाऱ्या व्यावहारिक क्रियांचे एकत्रीकरण म्हणजे जादू होय."

जादूचा अर्थ व जादू करण्यामागील उद्देश हा दोघांचेही स्पष्टीकरण डॉ. दुबे यांनी आपल्या व्याख्येत पुढीलप्रमाणे केले आहे. जादू ही अशी शक्ती आहे की, ज्यायोगे अतिमानवी जगतावर नियंत्रण प्रस्थापित करून तिचा वापर जादुगार आपल्या ईच्छेप्रमाणे चांगल्या किंवा वाईट अशा दोन्ही तऱ्हेने करू शकतो.

जादूचे प्रकार :- जादूचे निरनिराळे प्रकर प्रचलित असल्याचे दिसून येते. हे प्रकर जादूचे हेतू व जादूचे रूप या घटकांवर आधारित आहेत. फ्रेझर, मॅलिजोवस्की इत्यादी शास्त्रज्ञांनी जादूच्या निरनिराळ्या प्रकारांचे केले आहे.

१) फ्रेझरकृत जादूप्रकार :-

अनुकरणात्मक जादू आणि संक्रामक जादू असे जादूचे दोन प्रकार फ्रेझर यांनी वर्णन केले आहेत. समान कार्यामुळे समान कार्य निर्माण होते या तत्त्वावर अनुकरणात्मक जादू आधारलेली असते. उदा. :- प्रसूत झालेल्या स्त्रीला वृक्षाचे फळ खाण्यास दिले तर पुढचे वर्षी त्या वृक्षास पुष्कळ फळे येतात अशी ऑस्ट्रेलियातील आदिवासींची श्रद्धा आहे. छोटा नागपूर परिसरातील आदिवासी डोंगरावर जाऊन तेथील दगड खाली ढकलून देतात. यामुळे ढगांसारख्या गडगडाट होऊन पाऊस पडतो अशी त्यांची श्रद्धा आहे. संक्रामक जादू ही संपर्क नियमांवर आधारलेली असते. एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूच्या संपर्कात आली की हा प्रभाव नेहमीकरिता टिकून राहतो. उदा :- एखाद्या व्यक्तीच्या कापलेल्या नखांना अथवा केसांना काही इजा केली तर ते नख व केस ज्या व्यक्तीचे आहेत त्या व्यक्तीला इजा होते, असे जादूच्या या प्रकारामध्ये समजले जाते.

२) मॅलिनोवस्कीकृत जादूप्रकार :-

पांढरी किंवा धवल जादू आणि काळी (कृष्ण) जादू असे जादूचे दोन प्रकार ज्या हेतूसाठी जादूचा उपयोग केला जातो त्या आधारावर मॅलिजोवस्की यांनी पाडले आहेत. धवल जादूचा उपयोग स्वत:चे किंवा समूहाचे कल्याण व्हावे यासाठी केला जातो. अशाप्रकारे संकट निवारण करणे किंवा कल्याण करणे या हेतूने केलेली जादू म्हणजे धवल जादू होय.

पांढऱ्या जादूचा उपयोग :-

विंचू किंवा सर्पदंशामुळे होणाऱ्या विषदोषाचा त्रास कमी व्हावा या उद्देशाने मांत्रिक काही तांत्रिक स्वरूपाच्या प्रक्रिया करतात. कावीळ व अन्य काही आजार दूर होण्यासाठी मांत्रिक (भागात) पाणी किंवा खडीसाखर यावर जादुविद्येतील मंत्र टाकून तीन आजारी माणसाला सेवन करण्यासाठी देतात. परीक्षा, विवाह अथवा अन्य कोणत्याही स्पर्धेत यश प्राप्त करण्यासाठी गंडेदोरे, ताईत घालण्याचा प्रकार पांढऱ्या जादुशी निगडीत आहे. या सर्व उदाहरणांवरून केवळ आदिवासी समाजाताच नव्हे तर अन्य समाजामध्ये हि पांढऱ्या जादूचे प्रस्थ आजही कायम आहे असे म्हणता येते.

कृष्ण जादूचा ( काळया जादूचा ) उपयोग :-

आपला शत्रू पराभूत व्हावा किंवा तो आजारी पाडावा, त्याच्या वाट्याला दु:ख यावे यासाठी कृष्ण जादू केली जाते. अशाप्रकारे परविनाशाची आकांक्षा (इश्छा) ठेऊन केलेली जादू म्हणजे कृष्ण जादू होय. शत्रूला ठार केलेली जादू म्हणजे कृष्ण जादू होय. शत्रूला ठार मारणे हा उद्देश असेल तर काळी जादू करण्याच्या क्रियेत किंवा मंत्रोच्चारात चूक झाली तर त्याचा परिणाम जादुगारावरच होतो असे समजले जाते. एकेकाळी बंगाल हा कृष्ण जादूसाठी प्रसिद्ध असा प्रांत होता अशी जनसामान्यांची समजूत होती, हि काळी जादू करणाऱ्या स्त्रियांना गोंड जमातीत चेटकीन असे म्हणतात.

बहुतांश आदिवासी जमातींमध्ये कृष्ण जादूला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. कारण मनुष्य आजारी पडला की त्याच्या शरीरात अदृश्य स्वरुपातील परक्या व्यक्तीने प्रवेश केला आहे असे समजले जाते. म्हणून आजारी असलेल्या रोगी व्यक्तीला बरे करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे त्या अदृश्य स्वरूपातील परक्या व्यक्तिला शरीराबाहेर काढणे होय. हे करण्यासाठी पिशाच्चविद्या, चेटूकविद्या यांचा म्हणजे कृष्ण जादूच्या प्रकारांचा अवलंब केला जातो. अशाप्रकारे कृष्ण जादूला आदिवासी मध्ये महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

३) डॉ. शामचरण दुबेचे जादुप्रकार :-

संरक्षण, विनाशक जादू आणि संवर्धन जादू असे जादूचे तीन प्रकार डॉ. दुबेंनी वर्णन केले आहेत. संपत्ती प्राप्ती व्हावी, पाऊस पडावा, व्यापारात आणि इतर कार्यात यशप्राप्ती व्हावी या हेतूसाठी जी जादू केली जाते तिला संवर्धन जादू असे म्हणतात. संपत्ती, संरक्षण, रोगोपचार, जादूचा पतीवेध या हेतूंसाठी जी जादू केली जाते. तिला संरक्षक जादू असे म्हणतात. वादळे निर्माण करणे, शत्रूची संपत्ती नष्ट करणे, शत्रूस आजारी पाडणे व मृत्यू आणणे इत्यादी हेतूनी जी जादू केली जाते, तिला विनाश जादू असे म्हणतात.

**कु. साक्षी ठाकरे**

**बी. ए. भाग -३**

## आई

धरतीच्या कुशीत 'बी' रुजत असतं

आईच्या कुशीत बाळ निजत असतं

मायेची छाया जणू सूर्याची कोवळी

काळ्या  अंधारात दिवा होऊन देतेस प्रकाश

जळत असतांना व्हायची अंधार ......||१||

घरात खाणारे चार असतं भाकरीचे

तुकडे तीन मुलांच पोट भराव म्हणून

मला भूक नाही स्व:ता उपाशी राहून

देते भाकर सांग कसे फेडू तुझे उपकार

तु दिला जन्म मी तुझा केवडा तु

तु माझा अमृताचा साठा ......||२||

सरस्वती होऊन देते तू ज्ञान तुझ्यापुढे

आहोत आम्ही अज्ञान

तुझ्या संग राहून कळत नाही तुझी

माया तुझ्यापासून दूर होऊन आठवते.

तुझ्या 'अनुरागाची छाया' ......||३||

तुझ असणं प्रत्येक बाळाच्या 'प्राक्तन' मध्ये

नसतं जस पाऊसच पाणी धरतीच्या कुशीत

रुजत देहाचा 'खांब' बनून बाळाच्या सदैव

पाठीशी उभी राहणारी प्रीतीची छाया देणारी

तु माझी आई ......||४||

रात्र दिवस कष्ट करून बाळाला जपणारी

मिठीत साठवणारी रात्रीची पहाट  कधीही

न संपणारी प्रेमाची लाट .........

चेहरा न बघता बाळावर माया लुटवणारी

नऊ महिने पोटी ठेवणारी आई मन तुझे

शितल  'हृदय' कोमल दयेचा आहेस तू सागर ......||५||

चिडते, रागवते, मारतेस पण प्रेम ही तेवढेच करते

तुझ्या मायेच्या पदरात आहे माझा

'स्वर्ग' तू नसतांना 'वसुंधरा' वाटते जणू
नर्क तुझ्यामुळे पाहिले हिरवे झाड डोंगर
कसे फेडू तुझे उपकार ......||६||

तुझ्या डोळयात पहिले मी हे विश्व
सहन केले तू माझ्यासाठी खूप कष्ट
हातच बोट धरून चाललो तुझ्या संग तुझ्यामुळे
पाहायला मिळाली सृष्टी सुंदर ......||७||

तुला रडतांना पाहिले तर येतात माझ्या
डोळयात 'अश्रू' सांग आई मी तुला
कसे विसरू तुझ्यामुळे आहे आई
ईश्वरी छत्र  छाया ......||८||

तूच मित्र, तूच मैत्रिन,
तूच गुरु, तूच ईश्वर
रक्ताचं पाणी, जीवाचा रान करून
करते पालन पोषण .......||९||

**गजानन रामा ताथोड**

**बी. ए. भाग -३**

## पर्यावरण आणि मानवी जीवन

पर्यावरणाबाबत जागरुकता निर्माण आली, तर भविष्यात पर्यावरणाचे रक्षण होण्याची शक्यता राहील. पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन की केवळ सरकारची जबाबदारी नसून त्याकरिता समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. यासाठी पर्यावरण जनजागृती पर्यावरण संरक्षण करण्याच्या सकारात्मक भूमिकेतून पाऊल उचलले तरच उद्याचे दिवस चांगले असतील.

गेल्या काही वर्षात प्रदुषणाऱ्या भस्मासुर वाढत आहे. संपूर्ण जगाला जागतिक तापमान वाढीचा आणि बदलत्या हवामानाच्या समस्येचा विळखा पडला आहे. वाढत्या सिमेंट शहरीकरणाचा आणि औद्योगिकरणाचा सर्वाधिक परिणाम प्रमाणाच्यांवर होत आहे. प्रदुषणाची ही समस्या दिवसेंदिवस भयंकर स्वरूप धारण करीत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा तोल बिघडत असल्यामुळे प्रत्येक नागरीकांने सामाजिक प्रयत्नासोबत वैयक्तिकरित्या प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतु सर्वसामान्य नागरीक निर्सगाची काळजीच घेत नाही. पर्यावरणाची कमालीची हेडसाळ

करतात. याचा राग जणू निसर्ग व्यक्त करतो. पाऊस पडला नाही नद्या, नाले, धरणे आटली की माणसाला, ईश्वराची निसर्गाची आठवण येते, पर्यावरणाची आठवण येते. "झाडे लावा झाडे जगवा" चे केवळ नारे वर्षानुवर्षे करोडो रुपये खर्च करुन दिले जातात. तरीपण वृक्षारोपाचे फलित नगन्यच, वृक्षरोपण केलेली झाडे जगतात की मरतात याकडे कोणाचे लक्ष नसते. वातावरण चांगले शुद्ध करण्यासाठी झाडे मदत करतात. झाडे लावल्याबरोबरच त्या झाडाची निगा राखन्याचे दायित्व पत्करर्तिल अशा संघटनांची मदत जनतेने आवरर्जून घ्यावी. केवळ वृत्तपत्रातून छायाचित्रे झळकविन्यासाठी उत्सवी स्वार्थी, समारंभ नकोत.

सर्वसंपन्न निसर्ग, वनस्पती, प्रांणी पक्षी, संपत्ती, शुद्ध हवा, शुद्ध पाणी हे सर्व वातावरणाचे घटक आहेत पृथ्वीचा ७०% भाग पाण्याने व्यापला आहे. पण मनुष्याला पिण्याचे पाणी देखील पुरेशा प्रमाणात मिळत नाही. कारण मोठमोठ्या नद्या पर्यावरणाच्या -हासामुळे कोरडया पडत आहेत. शिवाय दुर्लक्ष्यामुळे, बेसुमार जंगलतोड, औद्योगिकरण-कचरा, ऑइल, कुलेन प्लॉस्टिक इ. टाकाऊ कचरा शिवाय नैसर्गिक आपत्तीच्या घटना विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड होत असल्याने, जैविक विविधतेचा -हास होत असून वनस्पती, प्राणी, पक्षी, यांच्या जाती नष्ट होत आहेत. अशा अनेक समस्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे.

समाजाच्या सर्वच क्षेत्रामध्ये आज शुद्ध पर्यावरणाची निकड भासत आहे. परंतु पर्यावरणाकडे समाज जाणून बुजुन दुर्लक्ष करत आहे. हिच मोठी शोकांतिका म्हणावी. पृथ्वीने व निर्सगाने दिलेली सगळ्याप्रकारची देणगी जतन करणे महत्त्वाचे आहे, पर्यावरण टिकले तर मनुष्याचे जीवनमान सुधारेल राज्य सरकारच्या पर्यावरण,विभागाच्या वतीने गेली काही वर्ष पर्यावरण जनजागृतीचे अनेक उपाय राष्ट्रविण्यात येतात.पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाकरिता उपाययोजना, पर्यावरण विषयक कायदे केले जात आहेत. परंतु नुसते कायदे करुन फायद्याचे नाही, तर कमाद्यायची अंलबजावणी झाली पाहिजे. समाजामध्ये पर्यावरणाबाबत जागरुकता निर्माण झाली पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण होण्याची संवर्धन करण्याची जबाबदारी केवळ सरकारची नसून प्रामुख्याने ते आपल्या पासून सुरुवात करावी असे मला प्रामाणिकपणे वाटते. त्याकरिता समाजातील प्रत्येक व्यक्तिचा सहभाग तितकाच महत्वाचा आहे. यासाठी पर्यावरण जनजागृती, पर्यावरण संरक्षण करण्याच्या सकारात्मक भूमिकेतून पाऊल उचलले, तरच उद्याचे दिवस चांगले असतील त्यासाठी पर्यावरणाचे रक्षण अपरिहार्य आहे.

**- कु. गायत्री सदानंद काकड**

**बी. कॉम भाग -२**

## वाचाल तर वाचाल

**" Books are our best friends "** - म्हणजेच " पुस्तके ही माणसांची खरी मित्र असतात." हे सुविचार ज्या थोर महापुरुषाने म्हटले आहे त्याने बरोबर म्हटले आहे. कारण पुस्तक ही खरोखर आपली चांगली मित्र असतात. ती वाचल्याने आपल्याला एका चांगल्या मित्राची अनुभूती होते.

'वाचाल तर वाचाल' या तिन शब्दांची ही ओळ जेवढी वाचण्यास किंवा लिहिण्यास सोपी आहे तेवडीच आचरणात आणण्यास अवघड. या तिन शब्दाची ही ओळ एका महापुरुषाने म्हटली आहे, हे महापुरुष म्हणजे

वाचनाची आवड ठेवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बाबासाहेब आंबेडकरांनी हे वाक्य खरतर तरुण पिडीला उद्देशून म्हटलं आहे. त्यांच्या मते जर आपण वाचन करू तरंच आपल्याला ज्ञान प्राप्त होईल. जो एक उत्तम जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे.

आपण सगळेच जगण्याच्या धरपडीत गुंतलेली जीवं आहेत. रोजची धावपळ रोजचे प्रश्न सोपे राहिले नाहीत. व्यवहाराचा रेटा असा आहे की त्याने आपल्या आयुष्याचे रींगण अगदी छोटे केले आहे. पुस्तके या रिंगनाला सारखे मोठे करीत राहतात. जगाच्या पाठीवर नाना प्रकारची माणसे त्यांचे अनुभव लिहीत राहीली आहेत. कुणी कथा-कादंबरी लिहिल्या आहेत,कुणी कविता आणि गीते लिहिली आहेत, कुणी प्रवासवर्णने लिहिली आहेत, तर कुणी वेगळया वाटा चालताना आलेले अनुभव शब्दात आणले आहेत. माहिती देणारी पुस्तके निराळी आणि आनंद देणारी पुस्तके निराळी चांगले पुस्तक वाचल्याचा आनंद काही निराळयाच असतो. तहान लागल्यावर पाणी प्यायला मिळणे किंवा उन्हातून घरात सावलीला आल्यावर वाऱ्याच्या गार झुळकेने शांत होणे हेही आनंदाचेच असते. पण हा आनंद शरीराचा असतो त्यापलीकडचा एक आनंद असतो आपला पूर्ण झाल्याचा किंवा प्रत्यक्षात आपल्याला हवं ते मिळाल्याचा वा मिळवील्याचा हा मनाला मिळणारा आनंद वेगळा असतो. पुस्तक वाचल्याने, मिळणारा आनंद मात्र या दोन्ही आनंदापेक्षा अगदी निराळा तो शहाणे होण्याचा आनंद असतो. ज्ञान मिळाल्याचा आनंद असतो. जग दिसण्याचा आयुष्य समजण्याचा आनंद असतो.

पुस्तक वाचल्याने आपण संपूर्ण क्षेत्रातील ज्ञान ग्रहण करू शकतो. असे म्हटले जाते की ज्ञान ही एकमेव अशी गोष्ट आहे की जी वाटल्याने वाढते, जर आपल्याकडे एकाच वेळी ऐश्वर्य, चांगले रूप व ज्ञान असले तर कालांतराने त्यातील दोन गोष्टी कमी जास्त होतील पण ज्ञान तुमच्या कडेच राहील ते तुमच्या कडून कुणीच घेऊ शकत नाही असं म्हणतात की ‘पुस्तक ही आपली खरी मित्र असतात’. कारण ती सदैव आपल्या सोबत असतात सुखातही, दुखातही पुस्तक नेहमी आपल्याला खूप काही नवनविन ज्ञान देत राहतात. आपण त्यांना कसेही ठेवतो त्याकड़े लक्ष सुद्धा देत नाही. तरी पुस्तक सदैव आपल्या सोबतीना असतात, ते कधीच कुठलीच तक्रार करत नाही.

पुस्तक आपल्याला खूप काही शिकवतात जगणं कस असत! जगताना वेगवेगळया प्रसंगात माणसे कशी वागतात, कशी हिमंत धरतात, मोडून आधार कशी मिळवतात, कटू प्रसंग कसे हाताळायचे , हेही आपल्याला ने शिकवतात चरित्रे आत्मचरित्रे ही तर माणसे समजुन घेण्याची मोठीच वाट आहे आपण कुतुहलाने दुसऱ्याच्या आयुष्याकडे त्यांच्या खाजगी गोष्टीकडे पाहलो खरे, पण कुतूहल संपते तिथे आपलीच समजून मोठी होते. जाते माणसांचे चुकणे, माणसाचे नाती सांभाळण, सहजपणे, क्षमाकरणे स्वार्थापलीकडे विचार करणे अशा आपल्याला शिकवून जाणाऱ्या किती तरी गोष्टी असतात. पुस्तक पुष्कळदा आपल्या वयाच्या वेगवेगळया टप्प्यावर आपली सोबत करतात. चांगल्या पुस्तकांची सोबत तर कित्येक वर्षाची असते. एकटपणात पुस्तकासारखा जिवलग सहवास दूसरा नाही. दुःखात पुस्तकासारखा साथी दूसरा नाही.

कित्येक वेळा एखादे चांगले पुस्तक वाचतांना आपल्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळतात. महाभारतसारखा एखादा ग्रंथ तर अशा उत्तरांची संच आहे. पण टॉलस्टांयची ‘एना कॅरनिना’ वाचताना, मार्गरिट मिचैलाची कादंबरी 'गोन विय द विंड' वाचताना किंवा जी. ए. कुलकर्णी यांची पुस्तके वाचतांना आपण कुठली

माहिती मिळवत नसतो तर आयुष्य समजून घेत असतो. उर्मिला पवारंचे 'आयदान' या सारखे दुसरे आत्मचरित्र वाचली तर आपल्याला आपले प्रश्न छोटे वाटायला लागतात विषमतेचा सामना करण्याची जी उभारी या पुस्तकात आहे ती सांगणाऱ्या अनुभवांनी आपण स्वत मधल्या कमीपणाकडे आणि समाजामधल्या गैरसमजाकडे, अंध-रुढी प्रश्नाकडे पाहू लागलो. जात आणि धर्म यापलीकडे माणसं शेवटी माणसचं असतात.

दिवसें-दिवस माणसं अगदी व्यस्त झाली आहेत, माणसांना फक्त पैसा कमवायचा आहे. त्या साठी ते सतत दिवसभर कार्यरत असतान ते स्वतः साठी सुद्धा वेळ काढू शकत नाही. आणि जो काही वेळ त्यांना मिळतो तो वेळ माणसं फिरण्यात सिनेमा बघण्यात किंवा अजून कुठल्या दुसरीकडे गमावतात. सगळी सारखीच असतात असं नाही. जशी सकाळची वृत्तपत्रे विविध प्रकारची पुरवणी किंवा विविध प्रकारची पुस्तके वाचल्याने आपल्याला ज्ञान प्राप्त होते. आपण पुस्तके वाचल्याने कुठलेही प्रकारचे ज्ञान प्राप्त करू शकतो. पुस्तके वेगवेगळया प्रकारची असतात इतिहासांची आत्मचारित्रे, कादंबरी, साहित्य इत्यादी या सगळया पुस्तकातले ज्ञान आपण प्राप्त करू शकतो जे की एक उत्तम आयुष्य जगण्यास आवश्यक असते पण त्यासाठी आपल्याला वाचायला हवे म्हणुनच म्हटले आहे-**' वाचाल तर वाचाल '**

**- हर्षल संतोष खडे**

**बी. कॉम भाग -३**

## स्वावलंबी व्हा ! आत्मनिर्भर व्हा !

काळ कोणताही असो. हा आव्हानात्मकच आहे...! त्यासाठी, स्त्रियांनी आपले शिक्षण हे केवळ लग्नाचे चांगले स्थळ मिळविण्यापुरते मर्यादित न ठेवता, त्याचा व्यवहारात उपयोग करावा...! आपल्या पायावर उभे राहुनच संसाराची वाट धरण्याचा प्रयत्न करावा. किंवा लग्नानंतर तरी स्वयंपूर्ण व्हावे. सुशिक्षित असा किंवा नसा, तरिही सर्व व्यवहार नेहमी चोखपणे हाताळायला शिकविण... किंबहुना ते स्वत: हाताळावेतच...! ज्या व्यावहारिक कामांना, 'पुरुषी काम' म्हणून आपण स्पेशल लेबल लावून टाकले आहे. ती कामे कधी- कधी आपल्या खांद्यावर घ्यायलाही शिकवते... अशी कामे गरज पडल्यास सहज हातावेगळीच करता यायला हवी... आणि त्यांची सवय होईल इतक्यांदा ती करावीत...!

अनुभव.

खरंतर हा लेख मी कोविड अत्यंत शिखरावर असतानाच्या कालावधीत लिहला होता. आणि हा माज्या अनुभवतला एक क्षण आहे. पण यातील एक-एक शब्द आजच काय पुढची कित्येक दशके तितकाच महत्त्वाचा आहे व असेल.

नेहमीसारखा आजही मोबाइल कुणकुणला... अन-फोन नंबर पेशंटचा होता म्हणून उचलला... एक लेडी पेशंट होती. तिने तिचे त्रास व इतिवृत्त एका डॉक्टरला फोनवरील सवांदामध्ये सांगितले. आणि डॉक्टरनी औषधोपचार ऑनलाइन सांगून दिले. त्या लेडीने फिस विचारली, तर डॉक्टर बोल्ले. 'गुगल पे' करा. तर ती लेडी म्हणाली ' माझ्या मिस्टरांना सांगते हा पे करायला... ते पे करतील... माझ्याकडे गुगल पे किंवा फोन पे काहिही नाही...' तर डॉक्टर हो बोल्ले आणि फोन ठेवला, तर मी त्या लेडिच्या बाजूला बसलेली होती... अन मी विचारात पडले...!

त्या लेडी सोबत मी संवाद साधला. अक्षरस: पोटात गोळा आला तिचा आणि तिच्यासारख्या सुशिक्षित स्त्रियांचा विचार करून... तिने मला तिची स्टोरी सांगितली होती__

तिचे मिस्टर कोविड पॉजिटिव्ह होउन १५ दिवस होऊन गेले होते. क्रिटिकल असतानाही बेड मिळत नव्हता.. कसेतरी दवाखान्यात ॲडमिट झाले... स्कोवर ८ चा १८ वर पोहोचला. ICU ची वाटी.. ऑक्सीजन.. व्हेन्टीलेटर.. आणि पुढले सगळे काही महाभारत.

आणि इकडे ती दिड वर्षाच्या चिमुकलीला घेवून स्वत:ची, मुलीची एकटीच 'काळजी करत' काळजी घेत होती.. घरची ती आता एकटीच अचानक करती झाली होती... फिस पे करायचे म्हणले तरी सुशिक्षित असून तिच्या मोबाईलमध्ये गुगल पे किंवा फोन पे ॲप नव्हते. म्हणून साधी फ़ी पे करायला तिने तिच्या बेडवर कोविडशी झुंझत असलेल्या नवऱ्याला फोन करुन सांगितले. त्यानेही लगबगीने ती पे केली..

माझ्या मनात तेव्हाच विचार आला. किती छोटयाशा गोष्टींवर देखील आजही भारतीय महिला सुशिक्षित असुनही जवळपास पूर्णपणे कोणा न कोणा व्यक्तीवर तरी अवलंबून आहेत.

हो, जवळपास पूर्णपणेच आहेत.. मग ती व्यक्ती वडील असतील किंवा भाऊ बऱ्याच ठिकाणी नवरा किवा पुढे मुलगा वगैरे, अचानक हे सर्व अंगावर पडले, की मग सुरु होतो तो घाबरलेल्या जीवाचा धडधडता संभ्रम अवस्थेत एकला प्रवास...

आर्थिक कौटुंबिक आणीबाणी अचानक येऊन धडक देते. दिशाहिनता येते.. रस्ते कळत नाहीत.. आणि मग कसलाही व्यवहार न हाताळता असलेल्या स्त्रियांना अगदी लहानश्या गोष्टी साठीही मदतीसाठी नातेवाईक, शेजारी अशा कोणा ना कोणासमोर हात पसरावे लागतात.. सुशिक्षित बायकांचे हे हाल आहेत.

आणि संसारात स्त्री-पुरुष सोबत असताना एकमेकांना पूरक ठरतात...ठरावेत... पण काही कारणाने एकाची साथ सुटली, त्यावेळी आयुष्य ओझ, वाटावे इतके एकमेकांवर अवलंबत राहू नका... तर एकंदर सर्वांनीच आपण जो विखुरत्या गेलो आहेत संसाराच्या हातगाडीत कोणाला तरी मागे-मागे- जाताना, तिथे स्वत:ला सावरावे... वाईट वेळ येवो अथवा न येवो, पण कोणत्याही क्षणी स्वत:ला खंबीरपणे उभे राहता आहे पाहिजे. म्हणून आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक स्वयंपूर्ण स्वावलंबी व्हा. सर्व स्तरावरील व्यवहार हाताळायला शिका... आत्मनिर्भर व्हा....!!!.

**- कु. मनिषा सोनोने**

**बी. ए. भाग -३**

## सोशल मिडियाचे फायदे व दुष्परिणाम

आपण बघत आहोत की या काळामध्ये जगाचा प्रचंड विकास होत आहे. यातच बघितलं तर सोशल मिडियाच पण खूप मोठं योगदान दिसत आहे. 'सोशल मिडिया' मुळे लोक जवळ आले आहेत. सोशल मिडिया मुळे लोक एकमेकांच्या जास्त संपर्कात राहत आहे.

'सोशल मिडिया' मुळे काय फायदे आपल्याला होत आहेत.-

जेव्हा या सोशल मिडियाबद्दल आपल्याला माहिती नव्हती किंवा त्याच शोध लागला नव्हता. तेव्हा जगामध्ये परिस्थिती कशी होती आणि आता कशी आहे. जसे की आधीच्या काळामध्ये लोकांचे किंवा त्यांचे

नातेवाईकांशी ते सहज संवाद साधू शकत नव्हते. त्यामुळे कोणत्या चांगल्या किंवा वाईट घटना तर घडला तर त्यांना ते माहित होत नव्हते पण आता मोबाईल च्या माध्यमातून सर्व घटना लगेच कळत आहे. लोकांमधला दुरावा कमी होत आहे. लोक सर्वांच्या सुख, दु:खामध्ये सहज सहभागी होत आहेत.

असाच जर आपण दुसरा फायदा बघितला तर आता माहितच आहे कि देशामध्ये महामारीचा खूप मोठा प्रकोप सुरु होता. यामुळे खूप मोठ्या प्रमाणात सर्वच क्षेत्रामध्ये नुकसान झाले आहे. तसेच आपण जर बघितले तर शैक्षणिक माध्यमांमध्ये पण खूप प्रमाणामध्ये नुकसान झाले असते. पण 'सोशल मिडिया' ह्या माध्यमातून एवढ्या कठीण काळामध्ये पण शिक्षणाचा प्रभाव चालूच होता.

सोशल मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थी हा शिक्षण घेत होता व विद्यार्थी व शिक्षकांची कडी मजबूत होती. जगामध्ये सर्व कामे ठप्प असताना पण शैक्षणिक क्षेत्रामध्ये विकास होत होता. सोशल मिडीयाचा जर ह्या काळामध्ये विकास झाला नसता तर विद्यार्थी हा जीवनाच्या व शिक्षणाच्या शर्यतीमध्ये खूप मागे पडला असता. तसेच आता पण शिक्षण क्षेत्रामध्ये सोशल मिडीयाचा खूप चांगल्या प्रकार फायदा होत आहे. सोशल मिडीयामुळे कोणतीच गोष्ट ही जास्त कठीण वाटत नाही. कोणत्याही क्षणी मनुष्य अडचणीत असला तर सोशल मिडीयाच्या माध्यमातून खूप चांगल्या प्रकारे मदत होते व ते काम सोपे व्हायला लागतं.

तसेच आपण बघत आहोत की मनोरंजनासाठी पण 'सोशल मिडीयाचा' खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. जगामध्ये कोणत्या कोपऱ्यात कोणती घटना घडत आहे. या सर्वांचीच माहिती आपल्याला आपल्यापर्यंत पोहचत आहे. दुसरी गोष्ट जर आपण बघितली तर मनोरंजनाच्या माध्यमातून लोकांकडे कोणत विशेष ज्ञान किंवा त्या ज्ञानाचा विकास होत आहे. जसे कि आपण आधीच्या काळामध्ये बघितलं तर सोशल मिडिया हे साधन माहिती नसल्यामुळे जे लोकांकडे टेंलेंट आहे ते दुसऱ्यांपर्यंत पसरत नव्हते. उदा. :- जे आपण बघत आहोत की चित्रामध्ये विविध रंगाचे कर्तृत्त्व दाखवले जाते, ते पण खूप टॅलेंट आहे आधीच्या काळामध्ये माहिती होत नव्हते पण सोशल मिडिया मुळे मात्र ते सोप झाल.

आपल्या देशातील राजकारणामध्ये आपण सोशल मिडीयाच्या माध्यमातून जुडत आहोत.

तसेच सोशल मिडियामुळे आपल्यामधल्या खूप अडचणी दूर होत आहेत. उदा.

१) घरी बसून आपण रेल्वेचं तिकीट काढू शकतो.
२) घरी बसून आपण आपल्या जीवनावश्यक वस्तू मागवून घेऊ शकतो. यामुळे वेळेची खूप मोठ्या प्रमाणामध्ये बचत करू शकतो.
३) वरील सर्व फायदे फक्त सोशल मिडीयामुळेच होत आहेत, म्हणून जीवनामध्ये सोशल मिडीयाचं मोठं योगदान बघायला मिळत आहे.

आजच्या काळामध्ये बघितलं तर सोशल मिडीयाचा इतका उपयोग होत आहे की, माणूस माणसाला ओळखत नाही. दुसऱ्यांसाठी वेळ काढू शकत नाही. सोशल मिडीया मध्ये मग्न झाला आहे. माणूस हा माणसांपासून खूप दूर जात आहे.

आपण जर आधीच्या काळामधल बालपण बघितलं असेल, जेव्हा सोशल मिडीयाचा विकास जास्त झाला नव्हता तेव्हाच जर बालपण बघितलं, सर्व छोटे-छोटे किंवा शालेय वर्गामधले विद्यार्थी नेहमी रिकाम्या वेळेमध्ये एकत्र येऊन खूप सारे खेळ खेळायचे. त्यामुळे त्याचं जीवन हे आनंदमय राहत होत. निरोगी राहत होतं. आताच्या

काळामध्ये ते सर्व खेळ व तो आनंद विसरून चालले आहे. ते सर्व सोशल मिडीयावर व्यस्त दिसत आहेत. त्यामुळे त्यांना निरोगी जीवन व खुशीचं जीवन जगता येत नाही. त्यांना सोशल मिडीयावरच आनंद वाटत आहे.

तसेच आपण परत बघितलं तर विद्यार्थी जीवनाला तर खूप जास्त त्रास सहन करावा लागणार आहे. कारण विद्यार्थी जीवन जे खूप बदलून जात आहे. विद्यार्थी पुस्तक वाचायच्या ऐवजी सोशल मिडीयावर व्यस्त आहे. यामुळे भारतामध्ये महान नेते होऊन गेले आहे, त्यांच्याबद्दल त्यांना जास्त माहिती नाही. कारण पुस्तकाचं वाचन हे खूप कमी प्रमाणात झालं आहे. कारण सोशल मीडीयाकडे जास्त आकर्षण वाढलं आहे.

सोशल मिडीयाचा उपयोग होत आहे की, लोकांना आपली हानी होत आहे हे पण समजत नाही. आपण बघितलं तर आताच्या काळामध्ये लोकांना सोशल मिडीयानी इतकं प्रभावित केलं आहे की, काही लोकांना रात्र कधी होते या गोष्टीचं पण भान राहत नाही. त्यामुळे शरीराला झोपेचं प्रमाण खूप कमी भेटते. विविध आजाराच्या आहारी जायला लागतं. सुदृढ शरीर हे निरोगी शरीर बनायला सुरुवात होते.

दुसरा जर परिणाम बघितला तर लोकां-लोकांमधील संवाद दूर होत चालला आहे. कोणाकडे कुणाच्या सुख दु:खामध्ये सहभागी होण्याइतका वेळ राहिला नाही. आपण जर काही विशिष्ट ठिकाणी बघितलं तर जेथे लोकांचा समूह असतो.

तसेच अनेक ठिकाणी लोक १ किंवा २ तास सोबत बसले असता पण कोणी-कोणाचं नाव विचारण्याकरिता वेळ काढत नाही. कारण सर्व लोकं हे सोशल मिडीयावर व्यस्त असतात. यामुळे ही मानवतेची भावना विसरून जात आहेत.

तसेच सोशल मिडीयाच्या एवढया विकासामुळे माणसे वाईट प्रवृत्ती कडे वळत चालले आहे.

सोशल मिडीयाद्वारे फसवणुकी होत आहे. सोशल मिडिया मुळे एक प्रकारचे हैकर्स निर्माण होत आहेत. ते बँकेद्वारे किंवा इतर कामाद्वारे लोकांची फसवणूक करत आहेत.

वरील सर्व प्रवृत्ती ही सोशल मिडिया मुळे होत आहे वरील सर्व सोशल मिडीयाचे दुष्परिणाम आपल्याला बघायला मिळत आहे. आपण वरील सोशल मिडियाचे फायदे व दुष्परिणाम बघितले आहे. तर आपण बघितलं तर फायदे व नुकसान ही समान बाब आहे. त्यामुळे आपल्या सोशल मिडीयाचा उपयोग कसा करायचा आहे, ते स्वतःवर अवलंबून आहे. आपणास सोशल मिडीयाचा चांगला फायदा घ्यायचा आहे, की वाईट हे आपणच ठरवू शकतो. त्यानुसार त्याचा उपयोग करू शकतो.

**- कु. माधुरी गणेश ढोके**

**बी. ए. भाग -२**

## समाजमाध्यमांचे समाजावर होत असलेले अतिक्रमण

इंटरनेट उपलब्ध असणारा, विविध व्यक्तींशी संपर्क साधू देणारा व ते जपू देणारा मंच म्हणजे समाजमाध्यमे. अर्थात 'सोशल नेटवर्किंग साईट्स'. 'सोशल नेटवर्क अर्थात सामाजिक जाळे म्हणजे असे एक गट जिथे समान विचारांची, सारख्या आवडीनिवडींची माणसे एकत्र येतात. ह्या संज्ञेत जरी प्रत्यक्ष भेट अथवा संवाद अपेक्षित नसला तरी ही संज्ञा इंटरनेटवरील सेवेसही लागू पडते. ही सेवा मुख्यत: इंटरनेटवरील विविध संकेतस्थळांचा अभ्यास करते. अथवा संकेतस्थळांच्या मार्फत माहिती पुरविण्याचे काम करते. अशा संकेतस्थळांना समाजमाध्यमे किंवा सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे असे म्हणतात.

समाजमाध्यमांचा सध्याच्या स्पर्धेच्या युगात अत्याधिक वापर चालू आहे. सोशल साईट्सवर सध्या ऑनलाईन राहून संवाद साधण्याचं प्रमाण सुद्धा प्रचंड वाढल आहे. त्यामुळे होणाऱ्या सामाजिक विचारांची देवाणघेवाण आता सोशल साईट्सवर होते. त्यामुळे गल्ली-चौकात जमून किंवा थंडीच्या काळात शेकोटी पेटवून जमून रंगणारी भारतीय परंपरेची चर्चेची पद्धत लोप पावत चालली आहे, असेच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे सोशल साईट्सवर देश-विदेशातील मित्रांची वैयक्तिकरित्या सोशल साईट्सवर ग्रुप बनवून चर्चा करणे किंवा संवाद साधने शक्य होत असल्यामुळे समाजमाध्यमांचा मानवी जीवनात हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सध्याच्या काळात वैयक्तिक संवाद साधण्याकरिता व्हॉट्सअॅप हे सर्वात प्रसिध्द उपयोजन उपयोगात आणले जाते. त्यावरती चॅट करण्यासाठी एका विशिष्ट प्रकारचे चिन्हांकित दृश्ये व हावभाव असणारे मुखचित्रे असल्यामुळे हे उपयोजन सध्या खूप प्रसिद्धीस येत आहे.

समाजमाध्यमांचा मानवी जीवनात प्रत्येक ठिकाणी हस्तक्षेप वा अतिक्रमण वाढले आहे. आजच्या घडीला प्रत्येक काम समाजमाध्यमांवर अवलंबून राहून किंवा त्यांच्या मदतीने होत असते. समाजमाध्यमांच्या या सेवेची लोकप्रियता पाहता, अनेक भ्रमणध्वनी कंपन्यांनी ही सेवा थेट भ्रमणध्वनीवरच उपलब्ध करून दिली आहे. म्हणजे समाजमाध्यमांवर कुठल्याही प्रकारची मर्यादितता राहली नाही.

अनेक व्यावसायिक संघटना, जाहिरात संघटना, प्रमंडळे आपापल्या हेतुपुरस्सर समाजमाध्यमांचा पुरेपूर फायदा करून घेतात. तसेच ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे मिळविणे, पत्र पाठविणे, यासह सर्व प्रकारची कामे समाजमाध्यमे करीत असल्यामुळे मानवी जीवनात त्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याचप्रमाणे मानवी जीवनाची गतीसुद्धा वाढली आहे.

समाजमाध्यमांमध्ये सध्या अनेक प्रकारची संकेतस्थळे प्रसिध्द आहेत. समाजमाध्यमांमध्ये प्रमुखत: फेसबुक हे सर्वात विशाल व प्रसिध्द असलेले संकेतस्थळ आहे. या माध्यमामुळे विचार विषयक दळणवळणाची गती तर वाढलेलीच आहे. परंतु काही समाजकंटक जे समाजामध्ये तेढ पसरविण्याकरिता याप्रकारच्या समाजमाध्यमांचा पुरेपूर फायदा घेतात. यामाध्यमांतर सुविधांमुळे समाजात अफवा पसरवून दंगली घडविणे, तेढ निर्माण करण्यासारखे प्रकार वाढीस लागले आहे. मध्येच नाशिक मध्ये घडलेल्या हिंसाचारात अनेक जणांचा बळी गेला. या हिंसाचारामागे समाजमाध्यमांचा अफवा पसरविण्यासाठी पुरेपूर फायदा घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे शहरात समाजमाध्यमांचा उपयोग रोखण्यासाठी इंटरनेट सुविधा बंद करण्यात आली होती.

थोडक्यात सामाजिक कल्याणापासून ते गुन्हेगारी पर्यंत सर्वच क्षेत्रात समाजमाध्यमांचा उपयोग वाढला आहे. समाजमाध्यमांना आपण कशाप्रकारे वापरतो यावरच त्याचा फायदा किंवा तोटा अवलंबून आहे. कोणत्याही परिस्थितीत गरज भासल्यास तेव्हाच अशा समाजमाध्यमांचा उपयोग करावा अन्यथा करू नये. समाजमाध्यमांवर नेहमीच सक्रीय राहिल्यामुळे कुटुंबाला पालकांना किंवा नातेवाईकांना वेळ देणे किंवा भेटणे खूप कमी झाले आहे. त्यामुळे समाजमाध्यमांचा योग्य व मर्यादित प्रमाणातच आपण वापर करायला शिकले पाहिजे.

**- आदिनाथ झ्याटे**

**बी. ए. भाग -३**

## चित्रपट आणि समाज प्रबोधन

ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो 'रिपब्लिक' या ग्रंथात अनेक विषयांचे आपले विचार मांडतो. चांगला समाज घडण्यासाठी नागरिक चांगले हवेत. त्यासाठी नागरिकांचं प्रबोधन करणं आणि वाईट कला लोकांपर्यंत पोहचू न देणं हा त्याचाच भाग आहे. अशी मांडणी त्यात करून तो सेन्सॉरशिपचं समर्थन करतो. ख्रिस्ती धर्माच्या काही शतक आधीपासूनचे असे विचार विसाव्या शतकापर्यंत पाश्चात्य जगात रूढ होते. व्यक्तिस्वातंत्र्यासारखी लोकशाही मूल्य रुजण्याआधी इतरही बहुश: असचं चित्र होतं. एकोणिसाव्या शतकाअखेरीला जन्मलेला सिनेमा हे माध्यम बघता लोकप्रिय झालं. शब्दातून आशय पोहचवणाऱ्या साहित्यासारख्या कलाप्रकारापेक्षा हे दृकश्राव्य माध्यम अनेकांना शक्तिशाली वाटलं, कारण सिनेमा हा निरक्षर माणसालाही कळू शकते. त्यातच निरक्षरांपेक्षा सुशिक्षित अभिजन अधिक सुसंस्कृत असतात. असा विचार प्रचलित असल्यामुळे जनसामान्यांच्या भडकविण्याची किंवा वाममार्गाला नेण्याची क्षमता सिनेमात अधिक असते. असाही समज पसरला. त्याचमुळे धर्मरक्षकांना आणि सत्ताधाऱ्यांना सिनेमा एकाच वेळी आकर्षक आणि भितीदायकही वाटला.

विविध देशांमधील सिनेमाच्या सेन्सॉरशिपचा विकास पहिला तर तिच्या तिथल्या संस्कृतीविषयी तो पुष्कळ काही सांगून जातो. 'तुम्ही कस वाचता ते मला सांगा . मग तुम्ही कोण आहात ते मी सांगेन', असं तत्वज्ञ हार्डडेगर म्हणून गेला आहे. सिनेमाकडे एखादा समाज कसा पाहतो, त्यावरूनही असे निष्कर्ष काढता येतील. प्रेक्षागृहात चित्रपट पहायची पद्धत रुळली तेव्हा तिच्या सार्वजनिक स्वरूपामुळे अनेक देशांमध्ये चित्रपटांसाठी परवाना पद्धत सुरु झाली. भारतातल्या सेन्सॉरच मुळ स्वतंत्रपूर्व काळात ब्रिटनमधल्या सिनेमाटोग्राफ कायद्यात (१९०९) आहे. कोणत्या प्रकारचे चित्रपट प्रदर्शित व्हावेत यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न धर्मसत्ता, राज्यसत्ता आणि चित्रपट व्यावसायिक अशा तीन घटकांनी जगभर केला. त्यातूनच ब्रिटनमध्ये सेन्सॉर बोर्डाचा जन्म झाला. विनोदी निर्णय घेण्याचा सेन्सॉर बोर्डाचा इतिहासही जुनाच आहे. उदाहरणार्थ : १९२८ च्या एका चित्रपटावरचा हा ब्रिटीश सेन्सॉरचा शेरा : वर पाहता हा चित्रपट निर्थक आहे, पण त्याला जर काही अर्थ असलाच, तर तो फारच आक्षेपार्ह आहे, अमेरिकेत १९५२ पर्यंत चित्रपटाला केवळ धंदेवाईक माध्यम समजले जाई.

कलाप्रकार म्हणून अधिकृतरीत्या मान्यता नसल्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठीच्या घटनात तरतुदी चित्रपटांना लागुनच होत असत. एखाद राज्य किंवा शहर चित्रपटावर खुशाल बंदी आणू शकत असे. किंवा चित्रपटात काटछाटही करू शकत असे. चित्रपटात काय दाखवता यावं, याबद्दल स्टुडीओनी संमत केलेल्या 'प्रोडक्शन कोड' अमेरिकेत १९२० च्या दशकापासून अस्तित्वात होता. म्हणजे हि चित्रपट व्यावसायिकांनी स्वत:वरच लादलेली सेन्सॉरशिप होती. कोड पाळणाऱ्या चित्रपटांना संमत करणारी स्टुडीओप्रणीत संस्था तिथे १९२२ पासून कार्यरत आहे. ( सध्याच नाव : MPAA ) मात्र, कोड मोडणारे चित्रपटही प्रदर्शित करण्याची मुभा १९५० च्या दशकापासून चित्रपटांना मिळाली. असे चित्रपट प्रक्षोभक किंवा अनैतिक असतील. या भीतीपोटी त्यांना मर्यादित वितरण मिळे.

**कु. चैताली महाजन**

**बी. ए.. भाग - २**

## चलचित्र का समाज पर प्रभाव

गत वर्षो से विज्ञान निरंतर उन्नती पर है| नित नए आविष्कार करने में होड-सी लगी हुई है| मानव के जीवन को सुखमय बनाने के लिए वैज्ञानिको ने नए – नए आविष्कार किए उन्ही आविष्कारों में से एक है – चलचित्र अर्थात सिनेमा|

चलचित्र का आविष्कार अमेरिका के थामस एल्वा एडिसन नामक व्यक्ती ने सन १८६० में किया था| भारत में चलचित्र के जन्मदाता दादा साहिब फालके माने जाते है| उन्होंने सन १८९३ में, पहली मूक फिल्म 'हरिश्चंद्र' बनाई थी| बोलती फिल्म 'आलम आरा' थी, जिसका निर्माण सन १९३१ में बम्बई में हुआ था| धीरे - धीरे चलचित्र इतना लोकप्रिय हो गया कि बम्बई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली जैसे महानगरों में सिनेमाघरों का जालसा बिछ गया| छोटे-से-छोटे कस्बों और गांवो में सिनेमाघरों का होना, उनकी लोकप्रियता का प्रमाण है|

चलचित्र मनोरंजन हि क्यो, यह शिक्षण का भी एक माध्यम है| इसमें कोई संदेह नही कि सिनेमा शहरी जीवन कि एक अनिवार्य भूख बन गया है| चलचित्र हमारे जीवन में इतना अधिक प्रवेश कार जाएगा, शायद किसी ने यह सोचा भी नहीं होगा| सिनेमा के टिकटों का मूल्य बढा दिये जाने पर भी सिनेमाघरों के बाहर टिकट लेने के लिए खडी भीड में कोई परिवर्तन नहीं आया, भीड काम होने कि जगह बढती हि गई| सिनेमा घर के बाहर लगे 'हाउस फुल' के पट्ट से इसकी लोकप्रियता का अनुमान सहज हि लगाया जा सकता है| यदी चलचित्र लोकप्रिय हो तो टिकटों कि बुकिंग पहले से हि प्रारम्भ हो जाती है और सिनेमाघरों के बाहर टिकटे  ब्लैक में भी बिकती है|

चलचित्र मनोंजन के साथ – साथ ज्ञानवर्धन का भी सर्वोत्तम साधन है| नेत्रों से किसी भी वस्तू को प्रत्यक्ष देखने पर उसे समझना बहुत सरल हो जाता है| भौगोलिक, ऐतिहासिक, प्राकृतिक आदी विषयों कि जानकारी चलचित्रो द्वारा सहज हि हो जाती है| यदी सरकार जनता को  कोई विशेष संदेश देना चाहती है, तो उस विषय पर एक वृत्तचित्र तैयार कर लिया जाता है| जो चलचित्र प्रारम्भ होने से पूर्व दिखाया जाता है| शिक्षा के विस्तार में चलचित्र सबसे प्रभावशाली माध्यम है| विदेशो में भी शिक्षा के विस्तार में चलचित्रो का सहारा लिया जाता है| चलचित्र समाज सुधार में भी पीछे नही रहा है| भारत कि अधिकांश जनता अशिक्षित और अंधविश्वासी है| वह अपने हित हित कि बातें दुसरो के समझाए जाने पर भी कई बर समझने में असमर्थ राहती है| ऐसें में केवल चलचित्र का सहारा लिया जाता है| हमारे देश में नैतिकता से परिपूर्ण अनेक चलचित्रों का निर्माण किया गया है| जिसमें प्रमुख है – भगत सिंह, महाराणी लक्ष्मीबाई, जागृती, अछूत कन्या, तपस्या, पुकार आदी| ये चलचित्र सामाजिक और आर्थिक समस्यायों को लेकर बनाए जाते है और उनका समाधान भी इन  चलचित्रों में प्रस्तुत किया जाता है| चलचित्रों के माध्यम से खेती के आधुनिक तौर तरीके, वैज्ञानिक उन्नती चिकित्सा के क्षेत्र में कई हुई जनसंख्या को रोकने के लिए सरकार 'परिवार नियोजन' के विषय में लघु चलचित्र तैयार करवती है, जिसे अशिक्षित व्यक्ती भी शीघ्र ग्रहण कर लेता है|

चलचित्र मानव के मस्तिष्क पर सिधा प्रभाव डालता है| यह मनोरंजन का भी सबसे सस्ता साधन है| ढाई – तीन घंनते के चलचित्र को देखकर मानव सांसारिक जगत को छोडकर दुसरे जगत में वितरण करने लगता है| ऐसे में निर्देशकों को चाहिए कि वे समाज को विकृत करने वाले दृश्य न दिखाए, क्योकी व्यक्ती बुरी बात जल्दी और ज्ञानवर्धक बातें देर से ग्रहण करता है|

व्यवसायी वर्ग अपने माल के विज्ञापन हेतू चलचित्र गृहों का सहारा लेता है| विज्ञापन चलचित्र के प्रारम्भ, मध्य और अन्त में दिखाए जाए है| व्यवसायी वर्ग का उद्देश्य होता कि जनता माल को देखे और खरीदने के, लिए लालायीत हो, जिससें उनका प्रचार और आर्थिक लाभ हो|

हिन्दी भाषा व अन्य भाषाओ के प्रचार और प्रसार का कार्य भी चलचित्र करते है| ऐसे में फिल्म – निर्माता को चहिए कि वह भाषा कि शुद्धता पर पूर्ण ध्यान दे| वर्तमान में देशी और विदेशी सर्वश्रेष्ठ चलचित्रों का हिन्दी में रूपांतरण भी किया जाता है|

चलचित्र बेरोजगारी कि समस्या को दूर करने में भी अपना सहयोग देता है| चलचित्र निर्माण में लाखों लोगों को रोजगार मिलता है| अनेक अभिनेता और अभिनेत्रीया अपनी कला का प्रदर्शन कार राष्ट्रीय और आंतरराष्ट्रीय पुरस्कार जीतते है| जिससे समाज में कल के क्षेत्र में रुची को बढावा मिलता है| चलचित्र की लोकप्रियता का अनुमान इस बात से लगाया जा सकता है कि हमारे देश में हर वर्ष 'फिल्म-महोत्सव' मनाया जाता है| जिस देश-विदेश की सर्वश्रेष्ठ फिल्में दिखाई जाती है|

'अति सर्वत्र वर्जयेत' अधिकता सर्वत्र हानिकारक होती है| अधिक (सिनेमा) चलचित्र देखना समय और धन का नाश करता है| ज्यों – ज्यों हमारे जीवन में चलचित्र प्रवेश करता गया, त्यों – त्यों समाज में उसका विरोध भी बढा| लेकिन यह विरोध अनावश्यक नही है, क्योंकी इससे नैतिक मुल्यों का ऱ्हास हुआ| चोरी, डकैती और हत्या के नयें – नयें तरीके सिखते है| चलचित्र के अश्लीश दृश्य युवा पीढी को भ्रष्ट कर रहे है| अभिनेता – अभिनेत्री बनने के जुनून में युवक – युवतीया घर छोडकर बम्बई भाग जाते है| कुछ तो अपने लक्ष्य में सफल हो जाते है परन्तु शेष का जीवन नष्ट हो जाता है| कलाकारों के हव – भाव, वस्त्र, आचार, व्यवहार आदी से भी समाज बहुत प्रभावित होते है| चलचित्र के कारण हि भाषा में अनेकों अशुद्ध शब्दों का प्रयोग होता है, जिनका कोई अर्थ हि नहीं होता|

कई समाचार-पत्र और पत्रिकाए तो केवल चलचित्र पर जीवित है| चलचित्र देखने के पश्चात क्या मानव समाज में फैली कुरीतियों को दूर करने का प्रयत्न करता है, जैसे गरीब मनुष्य कि सेवा करना, बिना दहेज विवाह करना, नि:स्वार्थ भाव से नारी कि मदद करना आदी| हम तो कह सकते है की ऐसे लोगों की संख्या नगण्य है|

जिस प्रकार जल के प्रवाह को रोकने के लिए बांध बनाए जाते है अरु उस जल का उपयोग सिंचाई और बिजली बनाने के लिएं किया जाता है, उसी प्रकार चलचित्र के अवांछनीय दृष्यों पर रोक लगाने के लिए भारत सरकार ने एक 'सैसर बोर्ड' का गठन किया है| लेकीन फिल्म निर्माता उन्हे अनेक तर्को द्वारा सन्तुष्ट कार अवांछनीय दृष्य नहीं काटने देता|

उपसंहार – विज्ञान ने मानव को चलचित्र के रूप में आज के युग की सबसे अधिक विराट शक्ति दी है| यदि हम महाशक्तिशाली राष्ट्र का निर्माण चाहते है और युवा पीढी को चरित्रवान चाहते है, तो निर्माताओ और सरकार को सम्मिलित करना होगा| चलचित्र का प्रभाव समाज पर समय के अनुसार अच्छा भी है एवं बुरा भी| लोगों तक देश-विदेश की जानकारी, अलग-अलग संस्कृति और मुल्यों का सर बडे सरलता से लोगों को समझाया जा रहा है, परन्तु जैसे हर सिक्के के डॉ पहलु होते है वैसे हि जहां अच्छाई निवास करती है वहा बुराई का भी साया होता है| समाज की

आवश्यकता इस बात की है कि वह अच्छे से अच्छे दृष्यों द्वारा भारतीय संस्कृति के आदर्शों की रक्षा करता हुआ समाज को सत्पथ का पथिक बनाये| वह समाज के कलुषित अंग का पोषण न करे|

चलचित्र का प्रभाव को समाज के हर अंग में "असतो मा सद्गमय" के सिद्धान्त का पालन करते हुए सार्थकता से ग्रहण करना चाहिए|

**- योगेश शिवशंकर शर्मा**

**बी. कॉम. भाग -३**

## सोशल मिडिया का मुनाफा एवं दुष्परिणाम

प्राचीन काल में किसी भी संदेश को एक स्थान से दुसरे स्थान पर पहुचाने के लिए कबुतर का प्रयोग किया जाता था| फिर यह स्थिती धीरे – धीरे बदली| तो यह काम डाकिया के माध्यम से किया जाने लगा| जब भी दरवाजे पर कोई डाकिया डाक लेकर आता था तो उसको लेने के लिए सभी लोग दौड पडते थे| डाक को पहुचने में १० से १५ दिन के बिच लग जाते थे, परंतु धीरे – धीरे समय बदलता गया| रफ्तार लेती इस जिंदगी और बदलती सभ्यता ने जीवन के जीने के तरीके को कई रुपों में बदल दिया| धीरे – धीरे तकनीक इतनी बदल गई कि, इस मशिनीकरण के युग में सुविधाओं के नएं नएं आयाम खुलते गए|

आज के समय में पुरी दुनिया लगबग सिमटकर एक स्थान पर आ गई है और दुनिया को एक साथ जोडने में जिस तकनीकी ने यह महत्त्वपूर्ण भुमिका निभाई है, उसे इंटरनेट कहते है| इंटरनेट सूचना तकनीकी कि आधुनिक प्रणाली है, इंटरनेट को हम विभिन्न कम्प्युटरों के माध्यम से जुडे विश्व स्तरीय समूह को कह सकते है| इंटरनेट किसी एक कंपनी या सरकार के अधीन नहीं होता, यह प्रोटोकॉल के माध्यम से दुनिया भर के इलेक्ट्रॉनिक उपकरणो को एक साथ जोडता है| इस प्रकार इसका संपूर्ण विश्व में एक जल फैला हुआ है, इस व्यवस्था को 'साइबरस्पेस' कहा जाता है| सामान्यत: इंटरनेट और साइबरस्पेसको एक दुसरे का समानार्थी माना जाता है, परन्तु इनमें कुछ तकनीकी अंतर भी होता है| जैसे कि इंटरनेट केवल एक नेटवर्क है ज्योकि कम्प्युटर एवं सर्वर को एक साथ जुडता है| जबकी साइबरस्पेस संगणक नेटवर्क या कम्प्युटर नेटवर्क द्वारा जुडकर आपसी सम्पर्क से बनने वाले वातावरण को कहते है| इस साइबरस्पेस में कई अवधारणाए जुडी हुई है; जैसे – साइबर सिक्योरिटी, साइबर क्राइम, साइबर टेररिज्म आदी|

साइबरस्पेस व इंटनेट ने मानव जीवन के परिवर्तन में एक उल्लेखिनीय भुमिका निभाई| अगर आप इंटरनेट से जुडे गए हो तो पलक झपकते हि दुनिया की तमाम खबरों तक पहुचा जा सकता है| विश्व के किसी भी कोने में बैठे व्यक्ती से आप विडियो कोन्फ्रेसिंग कर सकते है, घर हि आप लाखों रुपयों का लेन-देन इंटरनेट के माध्यम से कर सकते है, इत्यादी| इंटरनेट ने ऐसे कई कामों को बहुत आसन बना दिया है|

इंटरनेट आज देश एवं समाज की आवश्यकता बन चुका है| इंटरनेट ने चाहे वे विकसित देश हो या विकसनशील देश हर देश में अपनी जगह बना ली है| संचार सेवाओं की बढती उपलब्धता, घटती लागत और आंकडों के भंडारण ने इसे काम समय में पुरे विश्व में लोकप्रिय वन दिया| इंटनेट ने प्रशासकीय क्षेत्रों, शिक्षा का क्षेत्र, राजनीतिक क्षेत्रों, आर्थिक क्षेत्रों, या व्यापारिक क्षेत्रो, हर क्षेत्रो में अपनी महत्त्वपूर्ण पहचान बना ली है, इंटरनेट के बिना इन क्षेत्रों का अस्तित्व लगभग न के बराबर है|

इंटरनेट प्रशासनिक कार्यों को बहुत हि आसन बना दिया है एवं इसके माध्यम से प्रशासकीय कार्यों में काफी पारदर्शकता एवं सुधार भी हुआ है| इसके माध्यम से लालफिताशाही, काम में देरी, भ्रष्टाचार काफी हद तक काम हो गए है| अब ज्यादातर प्रमाणपत्र बनवाने के लिए दफ्तरों के चक्कर नहीं काटने पडते, यह सुविधाए इंटरनेट पर एक हि लिंक पर उपलब्ध है| शिक्षा के क्षेत्र में तो इंटरनेट ने समझो एक नई क्रांती पैदा कर दि है| दुनिया भर को पुस्तके, एक्सपर्ट शिक्षकों के लेक्चर, दुनिया भर के विश्वविद्यालयों कि सुची, आदी महत्त्वपूर्ण चीजें आज इंटरनेट पर उपलब्ध है| वर्तमान समय में ऑनलाईन क्लासेस, क्लासरूम का प्रचलन तेजी से बढ रहा है|

आर्थिक क्षेत्र में भी इंटरनेट ने बहुत ज्यादा प्रगती की है, आज के समय में विश्व भर के बाजारों कि किंमत हम इंटरनेट के माध्यम से जान सकता है\ ई-कॉमर्स के माध्यम से घर बैठे हि हम वस्तूओं को खरीद व बेच सकते है| आज इंटरनेट की वजह से अर्थव्यवस्था कैशलेस अर्थव्यवस्था की तरफ बढ रही है, जिसकी वजह से नगदी का प्रचलन काम हो रहा  है और भ्रष्टाचार काम हो रहा है क्योंकी नगदी अर्थव्यवस्था होने से काला धन अधिक मात्रा में बढता है| विकसनशील देश कि अर्थव्यवस्था भी विकसित देश की अर्थव्यवस्था बनाने की तरफ बढ रही है|

इंटरनेट के माध्यम से सामाजिक व्यवस्था में भी बहुत ज्यादा परिवर्तन आया है| वर्तमान समय का समाज सिर्फ अपने गावं या शहर तक हि नहीं सिमट कार रह गया है, बल्की वह इंटरनेट के माध्यम से देश-विदेश के लोगों से अपने संपर्क बना रहा है एवं वहा की संस्कृति एवं सभ्यता को सीख रहा है| इंटरनेट ने स्वास्थ संबंधी जानकारी के साथ-साथ पर्यावरण संबंधित जागरूकता भी फैलाने का काम किया है| इंटरनेट का विकास होने के बाद सोशल मिडिया के माध्यम से अब ऐसी खबरें सामने आने लगीं| सोशल मिडिया ने राजनीतिको भी समझ रहे है और वहा के सकारात्मक राजनीतिक एजेंडे को अपने देश में फैलाने के लिए अभियान तक चला रहे है| लोगो के अंदर बहुत सी ऐसी प्रतिभाए होती है जो सोशल मिडिया के माध्यम से लोगों के सामने आ रहा है और उनको उचित प्लेटफॉर्म मिल रहा है|

अत: इंटरनेट ने मानव सभ्यता को एक बहुत बडी उपलब्धी प्राप्त कराई है| इसकी वजह से हि सामाजिक एवं राजनीतिक स्तर पर बहुत सारे सकारात्मक परिवर्तन हुए है, परंतु जितनी तेजी से इनके सकारात्मक परिवर्तन हुए है उतनी हि तेजी से इसका नकारात्मक असर भी सामाजिक आर्थिक एवं राजनीतिक क्षेत्र में देखने को मिला है| इंटरनेट के आणे से मनुष्य का जीवन जितना सरल हुआ है, उतना हि मनुष्य के अंदर आलसीपन आया है, जिसकी वजह से मनुष्य मोटापा, हृदय रोग, आदी बिमारीयों से ग्रासित हो गया है| इंटरनेट के माध्यम से साइबर अपराध में वृद्धी हुई है| निजता के हनन की समस्या लगातार बढ रही है| इंटरनेट पर गलत सूचनाओं का भ्रम, जाल फैलाया जाता है| इसकी वजह से समाज में तनाव की स्थिती उत्पन्न हो जाती है| इंटरनेट का प्रयोग आतंकवादी संगठन भी आतंकवाद फैलाने के लिए बडे पैमाने पर करते है| हालांकि इन संगठनों पर कई सुरक्षा एजेंसिया ध्यान राखती है, परंतु उसके बावजुद भी ये  आतंकवादी संगठन लोगों का ब्रेनवाश करके अपने संगठन में शामिल कर लेते है|

आज हैकिंग, फिशिंग, साइबर पुलिंग जैसे मामलों से लोग बहुत परेशान है| इन बढती समस्याओं का महत्त्वपूर्ण कारण भारत में डिजिटल साक्षरता कि कमी है, जिसकी वजह से साधारण लोग साइबर अपराधीयों के चक्कर में आ जाते है और अपनी पर्सनल डिटेल शेअर कर देते है|

आने वाला समय और भी अधिक डिजिटल होगा क्योंकी इंटरनेट अपनी पांचवी पीढी में प्रवेश करने वाला है, अत: हमें इंटरनेट संबंधी समस्याओं का समाधान अच्छे से निकालना होगा ताकि इंटरनेट को और भी अधिक

सुरक्षित एवं भरोसेमंद बनाया जा सके जिससे कि यह वरदान साबित हो वरना जितनी तेजी से इंटरनेट में सेंधमारी बढ रही है तो ऐसे में जल्द हि इंटरनेट अभिशाप भी बन सकता है|

**- कु. प्रेरणा प्रकाश डहाणे**

**बी. ए. भाग -२**

## Dr. Babasaheb Ambedkar and its work

Dr. Bhimrao Ambedkar is a very Popular Personality in india. He was popularly known as Dr. Babasaheb Ambedkar. He was a leading Politician Activist Social reformer. Philosopher, writer, Politician. Jurist, and economist an had an impactful Personality. He made everyone the necessity of education; discipline and well being dr. B.R. Ambedkar become the first low minister of the country in 1947. He was awarded the highest. citizen awards. awards Bharatratan 1990 Postmously. Dr Bhimrao Ambedkar worked For the Socio-economic devlopment's of the lower Caste and deprived Peoples. He worked to uplift Such a Community and brought various notable Changes. He help frame the con--Stitutio of india and was Chairman of the drafting OF india constitution Dr. Ambedkar also become the law minister of india. Dr. B. R. Ambedkar was a notable Personality in India. Dr. B. R. Ambedkar was a brilliant in economics from Landon university and Columbia university. He was scholar very well reputed person. Bhimrao one of the greatest leader of alltime in India.

**M. Sabir Mohammad Jamil**

**Class : B. Com.- I**

## Dr. B. R. Ambedkar : His Life and Work

Bhimrao Ambedkar was born on 14$^{th}$ April 1891 in the Mahu district of Madhya Pradesh. His family belonged to a lower caste Hindu community (Mahar) which was considered as untouchables. The untouchables were barred from the society. They were not allowed to take water from the wells of upper caste villages which consisted Brahmins. They were also not allowed to take the same bead of education as Brahmins used to take. They were treated as slaves, who were born for the only purpose of seruning, upper caste (self proclaimed) peoples.

And in such horrible community Dr. Bhimrao Ambedkar was borned. In his childhood he was smart as well as a witty kid. He knew that if he wanted to get repect in such societal system. He must acquire the knowledge. So from the childhood only he started studding at the pace which was way different than any person of his era might have seen or done.

In Mahu there is a famous legend regarding his way of study. He was not allowed to sit in the class with other upper class students so he used to ponder in the class through the windouss. At when the finals were class the Brahmin teacher asked his student to recite the tables but none of the educated students who claimed they were better than Bhimrao Ambedkar could recite the tables

properly. But Bhimrao Ambedkar not only recite the tables well but also recite. The tables which were studied at much higher classes.

Such incidences were common in the life of this uncommon man. He was granted scholarship from the king of Vadodara. H.H. Gaikwad. The king agreed to not only pay for his education fees but also he would pay allowance till he wanted to pursue education. His CV was consist of the degrees from the world's most prestigious colleges such as Columbia University, London School of Economic Oxford, University of Calcutta and much more. He was a Lawyer, philosophist, economist and also a actiuist working towords the betterment of the backword castes.

He was so reknowned, that he was the minister of Human Labour, before the independence of India. Breitishers considered him as must educated Indian of tha Ninteenith Century. After Independence he wrote the constitution of India, which is considered as most important document of India. He was also responsible for the Dams, which Nehru considered as Modern Temples of India. Also he has a statue at the grand enterance in the university of England.

**- Anandgovind N. Sapkal**

**Class : B. Com.- I**

## महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

**महाविद्यालयात कार्यरत सर्व विभाग कडून** सत्र २०२२-२३ मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रासेयो शिबीर, गरजूंना फराळ वाटप, पशु पक्षांच्या पाण्याच्या उपलब्धी साठी मातीचे जलपात्र वाटप, महिला दिनी होतकरू व मेहनत करणाऱ्या महिलांच्या सन्मान पत्रे देऊन सत्कार, विध्यार्थ्यांच्या विकासासाठी व्याखानमाला , आश्रम भेटी, राज्य स्तरीय साहित्य संमेलन व कृषी प्रदर्शनास अभ्यास भेट, Soft Skill for Personality Development या कार्यशाळेचे आयोजन, औद्योगिक स्थळांना अभ्यास भेट, विविध अभ्यास मंडळाचे गठन व त्याद्वारे कार्यक्रम, ग्रंथ प्रदर्शनी, काव्य चर्चा, भाषा संवर्धन पंधरवडा, जागतिक मराठी भाषा दिनी कार्यक्रम, विविध महापुरुषाच्या ज्यांनी दिनी अभिवादन व उद्बोधन कार्यक्रम, विध्यापीठाच्या युवा महोत्सवात व आंतर महाविद्यालयीन विविध स्पर्धात सहभाग, मानवी हक्क दिन, आर्थिक साक्षरता उपक्रम, क्रीडा उपक्रमात सहभाग, अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन विध्यार्थ्यांच्या विकासासाठी करण्यात आले.

### वाणिज्य व व्यवस्थापन विभाग - वार्षिक अहवाल -सत्र -२०२२-२३

आमच्या महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन मंडळा अंतर्गत सत्र २०२२-२३ मध्ये प्राचार्य डॉ.जयंत बोबडे यांच्या सहकार्याने विभाग प्रमुख डॉ.गजेंद्र वासनिक यांच्या मार्गदर्शनात खालील कार्यक्रम घेण्यात आले .

वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यास मंडळाचे उद्घाटन दि.१० ऑक्टो.२०२२ ला करण्यात आले . या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे संस्थापक सचिव श्री. बी. पी. पवार सर उपस्थित होते. अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी नव निर्वाचित अध्यक्ष- हर्षल खडे, उपाध्यक्ष- वेदांत शिरभाते, सचिव- मयुरी भस्कट, सहसचिव- दिव्या इंगळे, कोषाध्यक्ष- संदीप वानखडे, प्रसिद्धी प्रमुख- प्रज्वल कंकाळ , आनंदगोविंद सपकाळ व इतर सभासद उपस्थित होते.दि.२३ ऑक्टो.२०२२ ला दिवाळी उत्सवानिमित्त अकोला शहरातील निराधार व निराश्रित लोकांना फराळाचे वाटप करण्यात आले. दि.२८ डिसें.२०२२ ला डॉ.पंजाबराव कृषि विद्यापीठ , अकोला तर्फे राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनीला भेट देण्यात आली. दि.२० मार्च २०२३ रोजी अकोला शहरातील वाढते तापमान लक्षात घेता पक्षांना थंड पाणी मिळावे याकरिता पक्षांसाठी मातीचे जलपात्र महाविध्यालय लगतच्या परिसरामध्ये घरोघरी जाऊन वाटप करण्यात आले. दि.२३ मार्च २०२३ रोजी आर्थिक शिक्षण व जागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दि.१९ एप्रिल २०२३ ला अभ्यास मंडळांतर्गत Soft Skill for Personality Development या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दि.१९ एप्रिल २०२३ ला अभ्यास मंडळांतर्गत विध्यार्थ्यांना ATM Card कसे हाताळावे व आर्थिक व्यवहार कसे करावे याबाबत SBI ATM केंद्रात जाऊन सविस्तर माहिती दिली. दि.१३ मे २०२३ ला Akola MIDC परिसरातील बुलढाणा अर्बन हिमालया कोल्ड स्टोरेज, अकोला येथे औद्योगिक भेटी दरम्यान विध्यार्थ्यांना कोल्ड स्टोरेजचे महत्व पटवून दिले.

## इंग्रजी विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

As the session 2022-23 began, there were four faculties recruited on clock hour basis as per government of Maharashtra Resolution for filling up of vacant post in the Higher education institutions Nov. 2018. They are R. M. Sadanshiv working in this department since the session 2017-18 on clock hour basis sanctioned by the state government and approved by Sant Gadge Baba Amravati University, Amravati, Dr B. K. Dhore, Ku. Jyoti Wankhade and Aakash newly appointed in the session 2022-23. All of these four faculty members are qualified and experienced teachers.

So far strength is concerned it was finally figured out by the end of the month of August i.e.

Co-curricular activities:

The co-curricular activities arranged during this session begins with the formation of Inauguartion Literary Forum in the month of Oct, 2022 in which 9 students were given participation who will monitor the up coming activities of this session. The very first initiative of the Departmnet was implementation of Remedial Classes for Slow Learners the time table and the faculty arrange.

On April 13 Elocution Competiton competition was held and on April 14 & quot;Essay Competition"in name Dr Babasaheb Ambedkar" was organized in which 31 students were participated the list is attached herewith. To make student aware of the global challenges of survival, a special program on soft skills for Personality Developemnt was arranged in which 45 students were

participants. Besides, the Department has took a novel initiative by celebrating Birth Anniversary of WIlliam Shakespeare on dated April 23. All the students of B. A. I semester II were participants. The faculty shared their experiences and study of the literature by William Shakespeare, the greatest Dramatist in English language over world.

## मराठी विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२३

सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे शैक्षणिक सत्र २०२२-२३ या वर्षांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. जयंत बोबडे यांच्या सहकार्याने आणि विभाग प्रमुख भास्कर पाटील आणि प्रा. एन. एफ. चव्हाण यांच्या मार्गदर्शनात साहित्य आणि भाषेची अभिरुची वाढविणारे व भाषा समृद्ध करणारे कार्यक्रम राबविण्यात आलेत.

१) केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या आरोग्य योजना आहेत, त्याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत आणि त्यापासून त्यांच्या कुटुंबापर्यंत, समाजापर्यंत पोहचविण्याच्या हेतूने महाविद्यालयांमध्ये मराठी विभाग आणि अकोला महानगर पालिकेच्या आरोग्य विभागातर्फे 'एकत्रित महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' यांची माहिती पुरविण्यासाठी दि. २२ -९ -२०२२ रोजी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मनपाचे योजना समन्वयक आणि आरोग्य अधिक अधिकारी यांच्या समवेत प्राचार्य डॉ. जयंत बोबडे मराठी विभाग विभागाचे प्रा. चव्हाण प्रा. डॉ. भास्कर पाटील आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

२) मराठी विभागातर्फे दरवर्षीप्रमाणे सत्र २०२२-२३ या वर्षात देखील मराठी भाषा व वाङ्मय अभ्यास मंडळाचे गठन आणि उद्घाटन दि. २३ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जयंत बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु.साक्षी ठाकरे बी. ए. अंतिम वर्ष आणि इतर पदाधिकारी त्यांची उपस्थिती होती.

३) महाविद्यालय आणि वाणिज्य विभागातर्फे सामाजिक सेवेचा भावनेमधून शहरातील, परिसरातील गरीब व बेघर वंचित असणाऱ्या कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी म्हणून त्यांना महाविद्यालयाच्या वतीने दि. २३/१०/२०२२ रोजी फराळ वाटप करण्यात आला. त्यामध्येही मराठी विभागाचा सहभाग होता.

४) मराठी भाषा आणि साहित्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना साहित्य लेखन आणि वाचनाची गोडी निर्माण व्हावी या हेतूने, अकोला शहरांमध्ये दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी संपन्न झालेल्या 'वऱ्हाड लोककला साहित्य संमेलनामध्ये' विभाग मराठी, मराठी वाङ्मय अभ्यास मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि मराठी विषयाशी संबंधित विद्यार्थ्यांनी कृतीशील सहभाग घेतला.

५) दि. २४/०९/२०२२ रोजी वऱ्हाड लोककला साहित्य संमेलनाच्या निमित्ताने शहरांमध्ये उपस्थित झालेले आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक कलावंत साहित्यिक डॉ. गणेश चंदनशिवे मराठी साहित्याचे समीक्षक व कवी डॉ. केशव सखाराम देशमुख यांची भेट घेऊन साहित्यिक चर्चा घडवून आणली.

६) मराठी विभाग सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि मराठी विभाग सुधाकरराव नाईक कला व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ डिसेंबर २०२२ रोजी अभ्यासक्रमाला पूरक ठरणारी 'काव्य चर्चा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यासाठी चर्चक अभ्यासक म्हणून अभ्यासक्रमात समाविष्ट असणारे कवी, गीतकार प्रा. दासू वैद्य मराठी विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम गुगलच्या मिटच्या माध्यमातून घेण्यात आला.

७) मराठी भाषेचे संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने सुरू केलेले ' मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रम' या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये दि. २१ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत बोबडे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा संवर्धना संदर्भातील विचार विनिमय करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मराठी विभागाचे प्राध्यापक एन. एफ. चव्हाण व डॉ. भास्कर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

८) कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांची जयंती ही महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरी केली जाते, दि. २७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन हा कार्यक्रम माननीय प्राचार्य डॉ. जयंत बोबडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न करण्यात आला.

९) ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३१ मार्च ते ६ एप्रिल २०२३ यादरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये श्री विजय मते, श्री अमित सालगावकर, प्रा. पद्माकर सदांशिव, डॉ. जीवन पवार, डॉ. आशिष राऊत इत्यादी अभ्यासक, व्यावसायिक, रोजगार मार्गदर्शक अशा मान्यवरांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या व्याख्यानमालेचे आयोजन ग्रंथपाल अमोल मेश्राम व मराठी विभाग यांच्या द्वारे प्राचार्य डॉ. जयंत बोबडे यांच्या मार्गदर्शनात केले.

१०) महाविद्यालयाचा इंग्रजी विभाग आणि मराठी विभाग यांच्या वतीने दि. २३ एप्रिल २०२३ रोजी जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र सदाशिव प्राध्यापक ज्योती वानखडे आणि मराठी विभागाचे डॉ. भास्कर पाटील व प्रा. एन. एफ. चव्हाण यांनी जागतिक पुस्तक दिनाचे महत्त्व विशद करणारे भाष्य यावेळी केले.

.

## अर्थशास्त्र विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्राचार्य डॉ. जयंत बोबडे यांच्या मार्गदर्शनात अर्थशास्त्र विभागामार्फत प्रा. अनंत राठोड आणि अभ्यास मंडळाचे वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दि. १६/१०/२०२२ रोजी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. दि. १६/१२/२०२२ रोजी पंजाबराव

देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला द्वारा आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास भेट देण्यात आली. दि. १/०२/२०२३ रोजी भारतीय संसदेत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण विध्यार्थांना दाखविण्यात आले. दि. १९/०४/२०२३ रोजी SBI व अकोला जिल्हा कमर्शियल बँक ATM मलकापूर रोड, अकोला येथे अभ्यास पूरक दौरा करण्यात आला.

## समाजशास्त्र विभाग

वार्षिक अहवाल सत्र २०२२-२३

आमच्या महाविद्यालयात सत्र २०२२-२३ साठी दि. २० ऑक्टोबर २०२२ ला समाजशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी गठन करण्यात आली. यावेळी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. जयंत बाबडे यांनी कार्यक्रमाचे रीतसर उद्घाटन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने “मानवी हक्क दिन” १० डिसेंबर २०२२ ला साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत बोबडे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा. आकाश हराळ यांनी विद्यार्थ्यांना ‘मानवी हक्क’ या बाबत मार्गदर्शन केले.

विद्यापीठाच्या (MOU) संकल्पनेनुसार डॉ. संगीता तिहिले यांनी दि. ०३/०५/२०२३ रोजी धाबेकर कला महाविद्यालय या ठिकाणी व्याख्यान दिले. तसेच डॉ. अमरीश गावंडे यांनी दिनांक ०३/०५/२०२३ दुपारी आपल्या महाविद्यालयामध्ये ‘सामाजिक संकल्पना’ या विषयावर व्याख्यान झाले.

## राज्यशास्त्र विभाग

वार्षिक अहवाल – शैक्षणिक सत्र २०२२-२३

आमच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक सत्र २०२२-२३ साठी दि. २० ऑक्टोबर २०२२ ला राज्यशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत बोबाडे यांनी कार्यकारिणीचे रीतसर उद्घाटन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

राज्यशास्त्र अभ्यास मंडळांतर्गत दि. २६ नोव्हेंबर २०२२ या दिवशी ‘संविधान गौरव दिन’ डॉ. भास्कर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली या दिवशी वेगवेगळी कार्यक्रम घेतल्या गेले. संविधान उद्देश पत्रिका वाचन, संविधान घोषवाक्य, संविधानातील मूल्ये या

विषयावर 'परिसंवाद' आयोजित करून, संविधानातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवून, लोकशाहीला मजबूत करण्याचे आवाहन यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिनाच्या' निमित्ताने दि. ५ डिसेंबरला २२ रोजी आयोजित परिसंवादामध्ये विद्यार्थ्यांनी 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनंत राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "मानवी हक्क दिन" १० डिसेंबर २०२२ ला साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत बोबडे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा. आकाश हराळ यांनी विद्यार्थ्यांना 'मानवी हक्क' या बाबत मार्गदर्शन केले. 'राष्ट्रीय मतदान दिन' २५ जानेवरी २०२२ ला राज्यशास्त्र अभ्यास, निवडणूक साक्षरता मंडळ व राष्टीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला. यावेळी मतदान दिनाची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. मतदानाप्रती जागरुकता निर्माण करण्यासाठी डॉ. नितीन देऊळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल २०२२ रोजी 'बारा तास अभ्यास' हा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयाचे संस्थापक सचिव मा. बी. पी. पवार सर यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन करून, विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रोत्साहित केले. अतिशय उत्साहात हा उपक्रम राबविला गेला.

स्थानिक स्तरावरील शासन कारभार कशा पद्धतीने चालविला जातो, हे विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी क्षेत्रिय भेटीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना भेट देण्यात आली. यानुसार दि.९ मे २०२३ रोजी ग्रामपंचायत येवता, जि. अकोला येथे भेट देम्यात आली. सरपंच सौ. वंदना सिरसाठ यांनी शासनाच्या निरनिराळया योजनांची माहिती समाजातील सर्वात शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी कशा पद्धतीने कार्य केले जाते , याबाबत विद्यार्थ्यांनी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी सर्वांगीण उन्नतीसाठी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने या शैक्षणिक वर्षात अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

## इतिहास विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती आपल्या महाविद्यालयामध्ये दिनांक १२/०१/२०२३ रोजी इतिहास अभ्यास मंडळातर्फे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली होती. कार्यकर्माचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जयंत बोबडे, इतिहास विभाग प्रमुख प्रा. योगेश चव्हाण व प्रा. मनोज सोनोने व्यासपीठावरती विराजमान होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयंत बोबडे यांनी केले. कार्यक्रमांची प्रास्ताविक रोशनी राठोड यांनी केले. तर आभार प्रदर्शन अनिकेत उपरास यांनी केले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक इतिहास विभाग प्रमुख प्रा. योगेश चव्हाण यांनी केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे वेगवेगळे उदाहरण देऊन इतिहासाच्या वेगवेगळया घटनेवर प्रकाश टाकला. अध्यक्ष भाषणामध्ये डॉ. जयंत बोबडे सर यांनी वेले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## ग्रंथालय विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

ग्रंथालय विभागातर्फे शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आलेत. महाविद्यालयीन विध्यार्थ्याकरिता 'स्वातंत्र्य दिनानिमित्त' दि. १५/०८/२०२२ रोजी 'ग्रंथ प्रदर्शनीचे' आयोजन करण्यात आले. दि. २०/०८/२०२२ रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक व भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त ग्रंथालयामध्ये 'पुस्तक प्रदर्शनीचे' आयोजन करण्यात आले. दि. ०६/०९/२०२२ रोजी नवीन प्रवेशित विध्यार्थ्याकरिता 'INDUCATION PROGRAM' ग्रंथालय विभाग तर्फे घेण्यात आला. दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी दर वर्षी प्रमाणे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिवस" म्हणून साजरी करण्यात येते. १५/१०/२०२२ रोजी ग्रंथालय विभाग तर्फे पुस्तक प्रदर्शनी, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन करणायत आले. या उपक्रमामध्ये बी. ए. व बी. कॉम. च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सदर स्पर्धे मधील विजेत्यांना दि. २६ जनवरी २०२३ रोजी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

मागील २ वर्षापासून 'ग्रंथालय विभाग व मराठी विभागातर्फे' संयुक्तरित्या 'पाच दिवसीय व्याख्यानमालेचे' आयोजन करण्यात येत आहे. दि. ३१/०३/२०२३ ते ०६/०४/२०२३ या दरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेला बाहेरील वक्ते निमंत्रित करण्यात आले. बी. ए. व बी.कॉम च्या सर्व विद्यार्थ्यांनी व्याख्यानमालेचा लाभ घेतला. ग्रंथालयात या सत्रामध्ये २१७ पुस्तके नव्याने दाखल झाले आहेत. यात बी .ए. व बी. कॉम. तसेच काही पुस्तके दानातून मिळाले आहेत. कुरुक्षेत्र व योजना ही दोन मासिके, पाच वर्तमानपत्र ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत.

## राष्ट्रीय सेवा योजना - वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक प्राचार्य डॉ. जयंत बोबडे आणि रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गजेंद्र वासनिक यांच्या मार्गदर्शनात कार्यरत असून, सक्षमपणे रासेयो पथकव्दारे शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार वेळोवेळी आलेल्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार ग्रामपातळी व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात आले. नियमित कार्यक्रमासह सत्र २०२२-२३ मध्ये ग्राम कुशीनगर (येवता) येथे रासेयोचे निवासी शिबीर यशस्वीपणे घेण्यात आले. या गावात स्वयंसेवकांनी ग्रामस्थांच्या जाला समस्येसाठी पाणी अडविणारा बंधारा बांधला. परिसर स्वच्छता व वृक्षारोपणही करण्यात आले. बौद्धिक सत्रातातून नियोजित विषयावर मान्यवर अभ्यासकांची समायोचित व्याखाने झाली. नियमित कार्यक्रमात भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सव निमित्त निघालेल्या रँलीत सहभाग घेतला. याशिवाय महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध कृतिशील उपक्रम रा.से.यो. पथकाव्दारे राबविण्यात आले.

## शारीरिक शिक्षण विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२०२३

शारीरिक शिक्षण विभागातर्फे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. नितीन देऊळकर यांचे मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात आले. सत्र २०२२-२०२३ मध्ये आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत महाविद्यालीन संघ (१) हँडबॉल- सरस्वती कला महाविद्यालय दहीहंडा (२) शरीरसौष्ठव स्पर्धा - कला विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा (३) कबड्डी स्पर्धा - श्रीमती साळुंकाबाई राउत कला व विज्ञान महाविद्यालय वनोजा (४) मैदानी स्पर्धा - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती (५) तायंकादो स्पर्धा - शंकरलाल खंडेलवाल वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला (६) मुष्टीयुद्ध स्पर्धा - श्री शिवाजी महाविद्यालय अकोला (७) व्हॉलीबॉल स्पर्धा - श्री शिवाजी महाविद्यालय अकोला (८) शक्तीतोलन स्पर्धा- श्री शिवाजी महाविद्यालय अकोट (९) टेबल टेनिस स्पर्धा रालतो विज्ञान महाविद्यालय अकोला (१०) भारत्तोलन स्पर्धा - श्री शिवाजी महाविद्यालय अकोट येथे सहभागी होऊन विविध खेळांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

आमच्या महाविद्यालयाचा बी. कॉम. भाग दोनचा विद्यार्थी धनंजय चौधरी या खेळाडूने १८ व्या ज्युनिअर शक्तीतोलन स्पर्धेत नागपूर येथे ५९ किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदक जिंकले. तसेच बी. कॉम. भाग १ चा विद्यार्थी आनंदगोविंद सपकाळ ह्याने ८९ किलो वजनगटात भारत्तोलन या क्रीडाप्रकारात विद्यापीठात तृतीय क्रमांक पटकावला. कनिष्ठ महाविद्यालयाचा कला शाखेचा विद्यार्थी भूषण खडसे याने यवतमाळ येथे पर पडलेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत भालाफेक या क्रीडाप्रकारात चौथा क्रमांक पटकावला.

सत्र २०२२-२३ मध्ये शारीरिक शिक्षण विभागातर्फे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ अमरावती च्या निर्देशानुसार, विद्यार्थ्यांची शारीरिक कार्यक्षमता चाचणी घेण्यात आली. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. नितीन देऊळकर यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या भारत्तोलन, शक्तीतोलन व शरीरसौष्ठव स्पर्धेच्या निवड समितीच्या अध्यक्षपदी विद्यापीठाने नेमणूक केली. तसेच विद्यापीठातर्फे आयोजित 'आंतरविद्यापीठ पश्चिम विभागीय व्हॉलीबॉल (महिला) स्पर्धेत' आयोजन समितीत छाननी समितीच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली. यवतमाळ येथे संपन्न झालेल्या ४३ व्या राज्यस्तरीय महाराष्ट्र मास्टर्स अँथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत 'थाळीफेक' या क्रीडा प्रकारात तिसरा क्रमांक पटकावून कास्यपदक पटकावले. तसेच त्यांना २०२२-२३ या सत्रात २ स्थानिक संस्थांतर्फे, ४ राज्यस्तरीय, व १ राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त झाला आहे.

## सांस्कृतिक विभाग वार्षिक अहवाल - २०२२-२३

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जयंत बोबडे आणि सांस्कृतिक समितीचे समन्वयक प्रा. एन एफ चव्हाण आणि डॉ. भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथे आयोजित युवा महोत्सवांमध्ये महाविद्यालयाच्या वतीने वादविवाद, वक्तृत्व या स्पर्धांमध्ये दिन. १४ ऑक्टोबर २०२२ रोजी आनंद गोविंद सपकाळ आणि आकाश उमाळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यासोबतच अकोला शहरांमध्ये ७ जानेवारी २०२३ रोजी विख्यात चित्रपट निर्माता नागराज मंजुळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

झालेल्या मराठी गझल संमेलनामध्ये, संमेलनाच्या साहित्य दिंडीमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांना मराठी विभागाचे डॉ. भास्कर पाटील व प्रा. एन. एफ. चव्हाण आणि समाजशास्त्र विभागाचे प्रा. पद्माकर सदाशिव यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले. दि. २३ नोव्हेंबर २२ रोजी शिवाजी महाविद्यालय अकोला येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय वऱ्हाड लोकसाहित्य संमेलनामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक दृष्ट्या देखील कृतीशील सहभाग घेतला. दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी विद्याभारती महाविद्यालय अमरावती येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी आकाश विलास उमाळे यांनी क्रियाशील सहभाग नोंदविला. दि. १ मार्च २००२ रोजी शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला येथे महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार 'वाय ट्वेंटी' उपक्रमांतर्गत संपन्न झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी आकाश विलास उमाळे व आनंद गोविंद सपकाळ यांनी सहभाग नोंदविला.

---------------------------------------------